दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२६७ शनिवार, दि.१८ जानेवारी २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

मध्यमवर्ग कोंडीत, चारही बाजूंनी बोजाखाली

देशातला मध्यमवर्गीय आज चारही बाजूने संकटात सापडला आहे. मधल्या काळात बँकांचे व्याजदर कमी झाल्यामुळे हुकमी नफ्यासाठी मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शेअर बाजाराकडे आणि म्युच्युअल फंडाकडे वळला होता. निदान तिथे तरी आपल्या गुंतवणुकीवर चार पैसे जास्त मिळतील अशी त्याची अपेक्षा होती; परंतु गेल्या चार महिन्यांचा आढावा घेतला, तर मध्यमवर्गीयांची तिथेही फसगत झालेली पाहायला मिळाली आहे.

देशात सोयाबीनची विक्रमी खरेदी!

हमीभावाने १४ लाख टन खरेदी पूर्ण, केंद्रीय कृषी विभागाची माहिती

पुणे । प्रतिनिधी

देशात यंदा नाफेड आणि एनसीसीएफ या दोन्ही संस्थांनी सोयाबीनची हमीभावाने खरेदी केली. या दोन्ही संस्थांनी देशात जवळपास १४ लाख टनांची खरेदी केली. यंदाची खरेदी ही देशातील सर्वाधिक उच्चांकी ठरली. यापुर्वी २०१८–१९ मध्ये सर्वाधिक १९ हजार ४८३ टन खरेदी झाली होती. यंदाची खरेदी विक्रमी पातळीवर पोहचली असल्याचे केंद्रीय कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

सरकारने यंदा हमीभावाने सोयाबीनची विक्रमी खरेदी केली आहे. यंदा विक्रमी खरेदी झाली तरी एकूण उद्दीष्टाच्या ती केवळ ४१ टक्केच आहे. मध्य प्रदेशात सर्वाधिक ६ लाख २२ हजार टन, तर महाराष्ट्रात ५ लाख ५० हजार टन खरेदी झाली. आता केवळ महाराष्ट्र आणि राजस्थानमध्येच खरेदी सुरु आहे. बाजारात सोयाबीनचे भाव दबावात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने ही खरेदी केली आहे. तसेच यंदा केंद्रीय कृषी मंत्रालयाने सोयाबीनची खरेदी होऊन शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी पारदर्शक प्रक्रिया राबवली, असेही कृषी मंत्रालयाचे म्हणणे आहे. देशातील बाजारात यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच भावपातळी दबावात आहे. हमीभावापेक्षा बाजारात कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी ◀◀ पान २ वर

उद्दिष्टाच्या केवळ ४१ टक्के खरेदी

सरकारने यंदा सहा राज्यांमध्ये ३३ लाख ८५ हजार टन सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले होते. आता केवळ दोन राज्यांमध्येच खरेदी सुरु आहे आणि चार राज्यांधील खरेदी बंद झाली. असे असताना केवळ १४ लाख टनांच्या दरम्यान खरेदी झाली. म्हणजेच एकूण उद्दीष्टाच्या केवळ ४१ टक्के खरेदी पूर्ण झाली. जवळपास ६ लाख शेतकऱ्यांकडून सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे.

नाफेडची खरेदी अधिक

देशात झालेल्या १४ लाख टन खरेदीत नाफेडची खरेदीच जास्त आहे. नाफेडने १० लाख टनांच्या दरम्यान खरेदी केली. तर एनसीसीएफने ४ लाख टनांची खरेदी केली. नाफडची खरेदी केंद्रेही देशभरात जास्त होती. त्यामुळे नाफेडच्या खरेदीचा आकडा जास्त आहे.

महाराष्ट्र, राजस्थानला मुदतवाढ

देशात सोयाबीन खरेदीत मध्य प्रदेशनंतर महाराष्ट्र आणि राजस्थानचा नंबर लागतो. पण या दोन्ही राज्यांमध्ये उद्दीष्टाच्या तुलनेत कमी खरेदी झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्राला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तर राजस्थानला १४ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. इतर राज्यांमध्ये खरेदी आता थांबली आहे.

मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणीत वाढ

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्याप्रकरणी परभणी ते मुंबई लाँगमार्च

सूर्यवंशीच्या आईने १० लाखांची मदत पुन्हा नाकारली

परभणी । प्रतिनिधी

बीड आणि परभणीत झालेल्या हत्या प्रकरणाने मागचा संपूर्ण महिना ढवळून निघाला आहे. त्यातच अजूनही या दोन्ही प्रकरणातील तपास सुरूच असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, ◀◀ पान २ वर

कृषी साहित्य खरेदीप्रकरणी न्यायालयाने मागितले उत्तर

नागपूर । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी अजित पवार पक्षाचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव चर्चेत असून त्यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याआधीच्या सरकारमध्ये (शिंदे सरकार) कृषीमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी घेतलेल्या एका निर्णयावर प्रश्न उपस्थित केले आहेत. मुंडे कृषीमंत्री असताना कोणत्या आधारावर त्यांनी कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल केले? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे. तसेच पुढील दोन आठवड्यात यासंदर्भात स्पष्टीकरण देखील मागितले आहे.

राज्यात कृषी साहित्य खरेदीसाठीची डीबीटी योजना मुंडे कृषीमंत्री असताना बंद करण्यात आली आणि कृषी साहित्य खरेदी करून शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी सरकारने १०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. याअंतर्गत स्प्रे पंप व इतर कृषी साहित्य खरेदी करून शेतकऱ्यांना पुरवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या खरेदीत घोटाळा झाल्याचा दावा केला जात आहे. या संदभात शंतनू घाटे यांनी नागपूर खंडपीठात एक याचिका दाखल केली आहे. यात घाटे यांनी दावा केला आहे की बाजारातील किंमतीपेक्षा जास्त किंमतीत कृषी साहित्य खरेदी करून कृषी विभागाने कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे. ते म्हणाले, उच्च न्यायलयात मी अशी जनहित याचिका घेऊन आलो आहे की शासनाने १०३ कोटी रुपयांचे स्प्रे ◀◀ पान २ वर

जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रगतीची पहाट निर्माण करणे हेच माझे उद्दिष्ट–आ.सुरेश धस

जरेवाडी येथून व्ही.रमणी पॅटर्न चा शुभारंभ

पाटोदा । प्रतिनिधी

जि.प.च्या शाळांमधून ग्रामीण भागातील गोरगरीब शेतकरी, शेतमजूर आणि ऊस तोडणी कामगार यांची मुले शिक्षण घेत असतात या मुलांच्या जीवनात प्रगतीची पहाट होणे आवश्यक असून जिल्हा परिषद शाळा मधील पहिली ते आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केंद्र शासनाच्या पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान धोरणानुसार आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक टक्केवारी वाढ होण्यासाठी चाचण्या घेण्यात याव्यात आणि विद्यार्थ्यांच्या टक्केवारी चे मूल्यमापन करताना शिक्षकांनी केलेल्या कामाचे निरीक्षण केले जावे जेणेकरून विद्यार्थ्यांची शैक्षणिक ◀◀ पान २ वर

जम्मू काश्मीरमध्ये अज्ञात आजाराने ४० दिवसांत १५ मुलांचा मृत्यू

श्रीनगर। वृतसंस्था

जम्मू काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील गेल्या ४० दिवसांत १५ जणांचा मृत्यू झाला आहे, यामध्ये बहुतांश लहान मुलांचा समावेश आहे. मृत्यूला कारणीभूत असलेल्या आजाराचे गूढ अद्याप अस्पष्ट आहे. सरकारच्या आदेशानुसार, या मृत्यूची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. उमर अब्दुल्ला यांच्या सरकारने अज्ञात आजारामुळे झालेल्या मृत्यूच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, ''ते राजौरी जिल्ह्यातील बुधल गावातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत''.

अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, तज्ज्ञ पथकांनी गेल्या एका महिन्यात नमुने गोळा केले आहेत आणि या मृत्यूंना कारणीभूत ठरू शकणाऱ्या कोणत्याही आजाराचा प्रसार झाल्याचे कोणत्याही अहवालात आढळलेले नाही.

आष्टी तालुक्यात दोन सख्ख्या भावाचा खून, तिसरा गंभीर जखमी

आष्टी । प्रतिनिधी

वाहिरा येथे रात्री १० दरम्यान तीन सख्खा भावांवर त्याच्याच समाजातील काही लोकांना लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला केला या हल्ल्यात दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत.ही घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली.या प्रकरणी पोलिसांनी ८ जणाला ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपी शोधण्याची मोहीम सुरू असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले.

अजय विलास भोसले,भरत विलास भोसले असे मयताचे नावे असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी आहे.आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजय विलास भोसले,भरत विलास भोसले,कृष्णा विलास भोसले हे तिघे भाऊ वाहिरा येथे गुरूवारी आले होते.याच ठिकाणी वाहिरा गावातील व बाहेरील काही लोक जमा झाले होते.गुरूवारी दुपारपासून हे सगळे याच ठिकाणी होते.रात्री साडे नऊ ते दहाच्या दरम्यान यातील काही लोकांनी या तीनही भावांवर लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला चढवला या हल्ल्यात ◀◀ पान २ वर

मस्साजोगमधील आवादा कंपनीच्या कामगाराचा मृतदेह रस्त्यावर आढळला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीतील एका पंजाब राज्यातील मजुराचा मृत्यू झाला आहे. केज येथील रोडवर संबंधित कामगाराचा मृतदेह सापडला असल्याचे समोर आले आहे. सदर कामगाराचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पंजाब राज्यातील गुरुदास नावाचा कामगार हा केज तालुक्यातील मस्साजोग येथील आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीत मजूर म्हणून काम करीत होता. त्याचे नाव रचपाल हमीद मसीह आहे. केज शहरातील केज – अंबाजोगाई रोडवर असलेल्या चांदणी बार समोर त्याचा मृतदेह रस्त्यावर पडला असल्याचे आढळून आले. केज पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी ताब्यात घेतला.

६० लाख लाडक्या बहीणी होणार अपात्र

सर्व अर्जांच्या काटेकोर तपासणीला सुरुवात, चाळणी करून बाहेरचा रस्ता दाखवणार

मुंबई । प्रतिनिधी

सरकारने कोणत्या महिलांनी संजय गांधी निराधार योजना, नमो सन्मान आणि पीएम–किसान, कृषी विभागाच्या अवजारे अनुदान योजनेचा लाभ घेतला, शिवाय कोणत्या महिल्यांच्या कुटूंबाकडे चारचाकी वाहन आहे आणि आयकरदाता आहे याची तपासणी सुरु केली आहे. विविध विभागांकडून यादी मागवून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची पडताळणी केली जात आहे. यातून किमान ६० लाख महिला योजनेतून बाहेर पडू शकतात, असा अंदाज आहे.

महिला आणि बालविकास विभागाने लाभार्थी महिलांच्या ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ५.५० क्विंटल			
	२,६५०	३,०९१	२,८५६
ज्वारी/हायब्रिड: ४९.५० क्विंटल			
	१,९५१	२,५०१	२,३०४
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : १०७.५० क्विंटल			
	६,४००	७,१२०	६,९४६
उडीद : ०.५० क्विंटल			
	६,०००	६,०००	६,०००
बाजरी: २२.०० क्विंटल			
	२,७७०	३,०००	२,९००
मुग :१.०० क्विंटल			
	६,०१०	७,०००	६,५०५
सोयाबीन: १८.५० क्विंटल			
	३,४००	४,०७०	३,८९७
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,८०१	६,०००	५,९००

साडेसात कोटी लोकांनी केले महाकुंभ स्नान

जगभरातून मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी

प्रयागराज । वृत्तसंस्था

महाकुंभात पहिल्या ४ दिवसात ७ कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर श्रद्धेची डुबकी घेत पवित्र स्नान केले. महाकुंभाच्या पांचव्या दिवशीही भक्तांचा अखंड ओघ सुरूच आहे. तर अनेक भाविकांनी संत महंतांच्या तंबुत जाउन त्यांचे आशिर्वाद घेतले आणि कथांचे श्रवण केले. महाकुंभ मध्ये भक्त मोठ्या संख्येने हजेरी लावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या गर्दीला सनातन धर्मा प्रती लोकांची दृढ श्रद्धेचे प्रतिक असल्याचे म्हटले आहे.

फक्त भारतच नाही तर, जगभरातून मोठ्या संख्येने भाविक महाकुंभात सहभागी होत आहेत. दक्षिण अफ्रिकेच्या जोहान्सबर्गहून आलेल्या नरसिंह स्वामींनी सांगितले की, त्यांनी अनेक वर्षांपासून महाकुंभात सामिल होण्याचे स्वप्न पाहिले होते. ◀◀ पान २ वर

मौनी अमावस्येसाठी विशेष तयारी

मौनी अमावस्येनिमित्त जास्तीत जास्त भाविकांनी स्नान करावे यासाठी योगी सरकार पूर्ण तयारी करत आहे. २९ जानेवारी रोजी मौनी अमावस्येच्या स्नानादरम्यान ६ कोटींहून अधिक भाविकांच्या गर्दीला तोंड देण्यासाठी रेल्वेने विशेष व्यवस्था केली आहे. रेल्वेने केलेल्या अतिरिक्त व्यवस्थेमुळे भाविकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही.

अग्रलेख

मध्यमवर्ग कोंडीत, चारही बाजूंनी बोजाखाली

देशातला मध्यमवर्गीय आज चारही बाजूने संकटात सापडला आहे. मधल्या काळात बँकांचे व्याजदर कमी झाल्यामुळे हुकमी नफ्यासाठी मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शेअर बाजाराकडे आणि म्युच्युअल फंडाकडे वळला होता. निदान तिथे तरी आपल्या गुंतवणुकीवर चार पैसे जास्त मिळतील अशी त्याची अपेक्षा होती; परंतु गेल्या चार महिन्यांचा आढावा घेतला, तर मध्यमवर्गीयांची तिथेही फसगत झालेली पाहायला मिळाली आहे.

वास्तविक, नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर शेअर बाजारातील गुंतवणुकीतून मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण लक्षणीयरित्या घटले आहे, तरीही मध्यमवर्गाने मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शेअर बाजाराकडे आपला मोर्चा वळवला होता; परंतु त्यातून जे रिटर्न्स गेल्या काही काळात मिळाले आहेत त्याची तुलना केली, तर मनमोहन सिंग सरकारच्या तुलनेत मोदी सरकारची कामगिरी येथेही फिक्कीच दिसते आहे. मनमोहन सिंग सरकारच्या कारकिर्दीत शेअर बाजारातील गुंतवणुकीतून तब्बल १७९ टक्के परतावा मिळाला होता; पण मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये हा परतावा ६१.२ टक्के, दुसऱ्या टर्ममध्ये ८१ टक्के आणि तिसऱ्या टर्ममध्ये आत्तापर्यंत ९.२ टक्के इतकाच परतावा गुंतवणूकदाराला मिळाला आहे. मध्यमवर्गाला आता कोंडीत पकडल्यासारखे झाले आहे. हा मध्यमवर्ग चारही बाजूंनी कराच्या बोजाखाली दबत आहे. या वर्गाला इतक्या ठिकाणी टॅक्स द्यावा लागतो की त्याचे जिणे मुश्किल होऊन बसले आहे आणि त्या तुलनेत मध्यमवर्गाचे उत्पन्न मात्र तितकेसे वाढलेले नाही. त्यामुळे आता उद्योग क्षेत्रातील संघटनांनीच लोकांचा टॅक्स कमी करा अशी हाकाटी सुरू केली आहे. मोदी सरकारने कॉर्पोरेट सेक्टरचा टॅक्स कमी केला; पण मध्यमवर्गीयासाठी दिलासाजनक अशी कोणतीही कामगिरी मागील काळात केलेली नाही. कॉर्पोरेट सेक्टरवरील टॅक्स कमी केला, तर या क्षेत्रातून गुंतवणूक वाढेल आणि रोजगाराला चालना मिळेल अशी अपेक्षा मोदी सरकारने धरली होती; परंतु ती अपेक्षाही फोल ठरली. आता पुढच्या महिन्यात सादर होणाऱ्या बजेटमध्ये आपल्या नशिबात काय वाढून ठेवले आहे याचा अंदाज अजून लागत नाही. देशाच्या एकूण सर्वच ठिकाणाच्या आर्थिक क्षेत्रात मोठी पडझड होताना दिसते आहे. विदेशी गुंतवणूक कमी होत आहे. ज्या विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक केली ती गुंतवणूक ते काढून घेत आहेत. बाजारात कंझम्पशन कमी होत आहे. त्यामुळे डिमांड कमी होत आहे याचा थेट परिणाम निर्मिती क्षेत्रावर होत आहे. निर्यात कमी होत आहे. विविध कंपन्यांच्या मालाला देशांतर्गत उठाव नाही. त्यातच तिकडे रुपया रोज नवी नीचांकी पातळी गाठत आहे. डॉलरच्या तुलनेत ८६ रुपयांचा टप्पा या आधीच ओलांडला असून आता डॉलरची किंमत ८७ रुपयांच्या दिशेने जाताना दिसते आहे. त्याचाही मोठा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होतो आहे. कुठूनच दिलासा मिळणारी स्थिती नाही. या परिस्थितीला मोदी सरकार आगामी बजेटमध्ये कसे सामोरे जाणार हा मुख्य प्रश्न आहे. देशातल्या गरिबांची मोदींना फारशी चिंता असल्याचे कधीच जाणवले नव्हते, पण निदान या सरकारचा पाठीराखा असलेला मध्यमवर्गीय मतदार जो आज कमालीच्या दबावात आणि चिंतेत आहे निदान त्याला तरी मदतीचा हात देण्याची जबाबदारी हे सरकार स्वीकारणार आहे की नाही, हा आजचा कळीचा मुद्दा आहे. देशाचा राष्ट्रीय विकासदर म्हणजेच जीडीपीसुद्धा निराशाजनक कामगिरी करताना दिसतो आहे. मागच्या आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी आठ टक्क्यांपेक्षा अधिक होता, पण यावर्षी आतापर्यंत तो ६.४ टक्के इतका घसरला आहे. म्हणजे एकूण आर्थिक वर्षाचा विचार करता जीडीपीमध्ये तब्बल दोन टक्के इतकी घट होताना दिसते आहे. एवढीच घट नोटबंदीच्या काळात आपण अनुभवली होती आणि त्याचे दुष्परिणाम देशवासीयांनी भोगले होते. आता पुन्हा हीच परिस्थिती या देशातील नागरिकांवर उद्भवणार आहे. अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री यांना या परिस्थितीची जाणीव आहे असे कुठेही जाणवत नाही. आता केंद्रातील सत्ताधारी उत्तर प्रदेशातील कुंभमेळा आणि दिल्लीतील निवडणुका यात गुंतले आहेत. अशा सरकारकडून आपण काही दमदार पावलांची अपेक्षा करूच शकत नाही. त्यामुळे या काळात केवळ गरिबांनाच नव्हे, तर मध्यमवर्गीयानांही रामभरोसे राहावे लागणार आहे.

आज जालन्यात राधाकृष्ण महाराज यांच्या भागवत कथेला प्रारंभ

जालना । प्रतिनिधी

श्रीमद् भागवत कथा समिती आणि सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. १८ ते २४ जानेवारी या काळात गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या आयोजित श्रीमद्? भागवत कथा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, शनिवारी (ता. १८) बडी सडकवरील श्रीराम मंदिर ते नवा मोंढा रोडवर ब्रजधामपर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात पेणार आहे.

घोडेस्वार, उंटस्वार, शाहिरी, लेझीम, ढोल व डांडिया पथक, विविध देखावे, कलशधारी महिला, विविध रथ हे शोभायात्रेचे आकर्षण ठरणार आहेत. ६ वर्षानंतर जालना शहरात गोवत्स न. पू. राधाकृष्णजी महाराज यांची कथा होत असून, सुमारे १५ हजार भाविक बसू शकतील, अशी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत कथा होणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता बडी सडकवरील श्रीराम मंदिरापासून शोभायात्रेला सुरुवात डोणार असून, बडीसडक, नरिमान बोड बसस्टेड, राजुरी कॉर्नर, मुंडे चौक ते बजधाम असा शोभायात्रेचा मार्ग टाहणार आहे. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी २५ स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत. शोभायात्रेत २० थांसह उंट व घोडेस्वार, १०१ कलशधारी महिला, गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज विराजमान असलेला रथ, प्रसिद्ध लक्ष्मी व बालाजी ब्रॉस बँड, उल्हासनगरचा बेंजो बँड, केरळचे बँड पथक, आत्याधुनिक चाऊ साऊंड, पंजाबी ढोल पथक, मंगलमय वाद्य, ततडम ताशा, शा, दांडिया पथक, बाल बारकरी दिंडी, लक्ष्मीकांतनगर येथील मंडपाची उभारणी विद्यालयाचे लेझीम पथक, दांडिया व ढोल पथक, भजनी मंडळ, माहेश्वरी किशोरी मंडळाच्या सुसज्ज रथावरील राधा कृष्णाचा देखावा, माहेश्वरी सहेली सखी ग्रुपचा रामदरबार, प्रसिद्ध शाहीर आप्पासाहेब उगले यांचे शाहिरी पथक, विप्र समाजाचा भगवान परशुरामांचा देखावा, सिंधी समाजाचा गोपी कृष्ण देखावा, सकल मराठा समाजाचा विठ्ठल-रुक्माई देखावा, लमाणी समाजाची झांकी, भागवत कथा ग्रंथ रथ, अकोल्याची बजरंगबली झांकी या शोभायात्रेत सहभागी होणार आहे. या भागवत कथेच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध भागात प्रभात फेरी, दि. १९ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता वृंदावन धामचे पूज्य इंद्रेशजी महाराज यांचा भजन महोत्सव, दि. २२ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या होणार आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून कथास्थळी दररोज माहेश्वरी युवा संघटनतर्फे व जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, जालना जनसेवा ग्रुप व विक्रम टी कंपनीतर्फे दररोज चहा तर सिंधी समाजातर्फे अल्पोपहार सेवा दिली जाणार आहे. या भागवत कथेचे युट्युबवरुन थेट प्रसारण केले जाणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी होऊन भागवत कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाने केले आहे.

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गायत्री महायज्ञ व गणपती अथर्वशीर्ष सहस्त्र आवर्तन अभिषेक

बीड । प्रतिनिधी

गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक- १७/०१/२०२५ शुक्रवार पौष वद्य संकट चतुर्थी निमित्त ''गायत्री महायज्ञ व (गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन अभिषेक'' आयोजित करण्यात आला . या यज्ञाचे यजमान- सौ.व श्री तुकाराम पंत जोशी सपरिवार हे होते.

आजच्या या गायत्री यज्ञाचे पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे होते, या कार्यक्रमात होम हवन तसेच एक गर्भसंस्कार हा कार्यक्रम देखील करण्यात आला, यावेळी यशवंत नगर मधील असंख्य माता भगिनी व भावीक भक्त उपस्थित होते, यामध्ये ॲड.मंगेश पोकळे सर अध्यक्ष श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर, मुकुंद भुतपल्ले, विलास लेंबे,हनुमानदास बियाणी, अनिल शेठ चरखा, महावीर सेठ बोरा, चंपावती पत्रचे महादेव नाना साळुंके, मेढे साहेब, म्हेत्रे काका,भराटे काका, चाटे साहेब,जाधव साहेब,मुढे सर, बाळासाहेब जायभाये, सुरेखा जाधव, पोकळे ताई, लेंबे काकू,पोकळे काकू, वृंदावणी साळुके, डॉ.आरती भूतपल्ले , अदी भाविक भक्त उपस्थित होते. अथर्वशीर्ष आवर्तना साठी वे.शा.संपन्न नारायणदेव सुलाखे सह ११ ब्रम्हवंद हजर होते.

मनू भाकर, डी गुकेश खेलरत्न पुरस्काराने सन्मानित

नवी दिल्ली । वृतसंस्था

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शुक्रवारी (१७ जानेवारी) भारतीय क्रिडा क्षेत्रातील दिग्गज खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न व अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपतींद्वारे ऑल्मिपिक पदक विजेती नेमबाज मनु भाकर, जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत विजयी ठरलेला डी गुकेश, भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंह आणि पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार या ४ खेळाडूंचा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतासाठी पहिले पॅराल्मिपिक सुवर्णपदक जिंकणारे मुरलीकांत पेटकर यांचा अर्जुन पुरस्काराने (आजीवन) सन्मान करण्यात आला. या ४ खेळाडूंव्यतिरिक्त ३२ इतर खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय, राष्ट्रपती मुर्मू यांनी अर्जुन पुरस्कार (आजीवन), राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार (नियमित आणि आजीवन) आणि मौलाना अबुल कलाम आझाद () ट्रॉफीच्या विजेत्यांनाही सन्मानित केले.

अंबाजोगाईत गोळीबाराचा थरार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे उडत असतानाच शुक्रवार दि.१७ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १० च्या दरम्यान शहरातील मोरेवाडी भागात असलेल्या माऊली नगर मध्ये अयशस्वी प्रेमातून गोळीबार घडल्याची थरारक घटना घडल्याने शहरामध्ये एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गोळीबार करणाऱ्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

शहरातील मोरेवाडी भागात माऊली नगरमध्ये स्वाराती रूग्णालयात परिचारिका म्हणून काम करणाऱ्या महिलेला एक मुलगी व एक मुलगा आपत्य असून पतीचे चार वर्षापुर्वी निधन झाल्यामुळे हे तिघेच या घरामध्ये वास्तव्यास होते. सदरील परिचारीका महिलेच्या मुलीचे तीन वर्षापासुन प्रेम संबंध आले होते. आरोपी नेहमी फिर्यादीस त्रास देत असल्यामुळे आरोपीशी ऑगस्ट २३ पासून संभाषण बंद केले होते. तरी पण आरोपी गणेश पंडीत चव्हाण वय २४ रा.गोविंद नगर रेणापुर जि.लातूर येथील नातेवाईकातील असलेला आरोपी याने फिर्यादी मुलीस फोन करून माझ्याशी बोलली नाहीस तर तुला व तुझ्या घरच्यांना जिवे मारून टाकीन अशा धमक्या देत होता. १७ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते १० च्या सुमारास आरोपी स्कुटी गाडीवर घरी येवून डीक्कितील बॅग बाहेर काढून घरात प्रवेश केला. घराच्या गेटचे दरवाजे उघडून घरात घुसण्याचा प्रयत्न केला. दार उघडण्यासाठी विनंती केली. दरवाजा उघडा असे म्हणत भिती पोटी फिर्यादी आई व भाऊ असे बेडरूममध्ये गेले असे आरोपी हा दरवाजा वाजवत असताना भाऊ हॉलकडे आला व खडकी बंद करत असताना आरोपी म्हणाला तु कशाला आलास निघून जा असे म्हणून खिडकी बंद करून रूमकडे येत असताना आरोपी गणेश चव्हाण यांनी पिस्टल द्वारे गोळी झाडली ती गोळी खडकीच्या काचामधून पडल्याला छिद्र पाडून सोप्या मध्ये घुसली आरोपी गणेश चव्हाण यांनी फिर्यादी व तिच्या कुटूंबियांना जिवे मारण्याच्या उद्देशाने पिस्टलाने गोळी मारून कुटूंबियांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात संबंधीत आरोपी विरूद्ध प्राणघातक हल्ला, धमकी देणे, शस्त्राधिनियमन या कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला असून सहाय्यक पोलिस निरिक्षक कांबळे हे करीत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस अधिकार्यांचा ताफा फिर्यादीच्या घरी शहरातील मोरेवाडी भागा लगत असलेल्या माऊली नगर मध्ये गोळीबार झाल्याची घटना घडल्याची माहिती मिळताच अतिरिक्त पोलिस अधिक्षक चेतना तिडके, पोलिस उपअधिक्षक चौरमले, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक विनोद घोळवे यांच्या स्टाफ सह हे सर्व जण घटनेच्या ठिकाणी दाखल झाले. घटनेचे गांभीरता लक्षात घेवून योग्य ती कारवाई केली.

आरोपीच्या शोधासाठी तीन पथके

शहरातील गोळीबार प्रकरणातील आरोपी पकडण्यासाठी शहर पोलिस ठाणे, ग्रामिण पोलिस ठाणे व पोलिस उपअधिक्षक कार्यालयातील अधिकार्यांची टिम पथक आरोपीच्या शोधासाठी रवाना केले होते. या पथकांना संबंधीत आरोपी रेणापूर शिवारातील ज्वारीच्या शेतात लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर सदरील आरोपीला पकडण्यसाठी तिन्ही पथकाच्या अधिकार्यांनी त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्यात यशस्वी झाले. घटनेची गांभीर्य ओळखूनच तपासाचे चक्रे फिरवल्यानेच आरोपीचा शोध लागला.

– चेतना तिडके,
अतिरिक्त पोलिस अधिक्षक अंबाजोगाई

पान १ वरून...

देशात सोयाबीनची

हमीभाव खरेदीला चांगला प्रतिसाद दिला. सरकारला सोयाबीन विकण्यासाठी शेतकरी थांबले आहेत. आजही बाजारात हमीभावापेक्षा ८०० ते १ हजार रुपये कमी भाव मिळत आहे. बाजारात सध्या सोयाबीन ३ हजार ८०० ते ४ हजारांच्या दरम्यान विकले जात आहे. तर यंदा हमीभाव ४ हजार ८९२ रुपये आहे. खुल्या बाजारात भाव मिळत नसल्याने सरकारची खरेदी यंदा वाढली आहे.

मंत्री धनंजय मुंडे यांच्या

पंप विकत घेऊन लाभार्थी शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. या पंपासाठी शासनाने प्रति लाभार्थी ३,६२५ रुपये इतकी किंमत घेतली आहे. सुरुवातीला या स्प्रे पंपाची किंमत १,५०० रुपये ठेवण्यात आली होती. तर, बाजारात या पंपाची किंमत २,६०० रुपये इतकी आहे. मग इतक्या अधिक किंमतीत हे स्प्रे पंप खरेदी करण्याचे कारण काय? कोणत्या आधारावर ही किंमत वाढवण्यात आली. यात गैरकृत्य झाले असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्यामुळे उच्च न्यायालयाने शासनाविरोधात नोटीस काढली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्याप्रकरणी

परभणीत पोलिस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्याप्रकरणाची कुटुंबीयांच्या न्यायासाठी अद्यापही रस्त्यावर उतरून लढाई सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी परभणी ते मुंबई लाँग मोर्चा काढण्यात येत असून कुटुंबीयांना न्याय देण्याची मागणी केली जात आहे. दुसरीकडे प्रशासनाकडून सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची जाहीर केलेली मदत देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, कुटुंबीयांनी दुसऱ्यांदा ही मदत नाकारली असल्याचे सांगण्यात येत आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने घरीआलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा एकदा परत पाठवले असल्याचे म्हटले जात आहे. पोलिस न्यायालय कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणात दोषी असलेल्या पोलिसांवर कारवाई करण्यात यावी. तसेच सूर्यवंशी आणि वाकोडे कुटुंबीयांना वाढीव मदत देण्यात यावी, यासह अनेक मागण्या घेऊन परभणी ते मुंबई असा लाँग मार्च आंबेडकरी अनुयायांकडून काढण्यात येणार आहे. परभणीतील धरणे आंदोलन स्थळापासून हा लाँग मार्च शुक्रवारी दुपारी १ वाजता मुंबईकडे रवाना झाला आहे. दिवंगत नेते विजय वाकोडे यांचे चिरंजीव आशिष वाकोडे या लाँग मार्चचे नेतृत्व करणार आहेत.

आष्टी तालुक्यातील दोन सख्ख्या

अजय विलास भोसले,भरत विलास भोसले या दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला तर तिसरा भाऊ कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत.या घटनतेली संशयित आरोपीना अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.हा खून का व कोणत्या कारणावरुन केला हे अद्याप समजले नाही.दोनही मृतदेह आष्टी ग्रामीण रूग्णालयात ठेवण्यात आले आहेत.शवविच्छेदन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,बाबासाहेब गर्जे, मनोजकुमार खंडागळे,भरत माने,बाबुराव तांदळे,लुईस पवार,दत्तात्रय टकले,पोलीस अंमलदार शिवदास केदार,सुदाम पोकळे,सतीश पैठणे अमोल शिरसाठ,शरद पोकळे यांनी भेट देत मोठ्या शिताफिने आठ संशयित आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले.

जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रगतीची

गुणवत्ता वाढवलेल्या चांगल्या शिक्षकांचे कौतुक आणि ज्या ठिकाणच्या विद्यार्थी शैक्षणिक टक्केवारी कमी पडेल तिथे शिक्षकांना जबाबदारीची जाणीव करून देणे अशा प्रकारचे शिक्षण पद्धती असणारे जरेवाडी पॅटर्न आणि मागील काळात राबवलेल्या वीरमणी पॅटर्न याचा समन्वय असलेली शिक्षण पद्धती जिल्हा परिषद शाळांमधून राबवावी यासाठी हा उपक्रम आयोजित केला आहे सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे आणि यापुढे राहील असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले जिल्हा परिषदेच्या जरेवाडी येथील एका विशेष कार्यक्रमांमध्ये ते प्रमुख मार्गदर्शन करताना बोलत होते यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की विधानसभा निवडणुकीतील प्रचार कालावधीत माझ्या आष्टी विधानसभा मतदार संघात जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी व्ही. रमणी पॅटर्न राबवणार..असे आश्वासन दिले आणि आज तो सुरू होत असल्याचे समाधान आहे असे सांगत जि.प.च्या शिक्षकांकडे असलेले अशैक्षणिक कामे कमी करून तपालासाठी शिक्षकांनी बीडला जाण्याची आवश्यकता नसून व्हाट्सअप मेसेज द्वारे काम करून शिक्षकांच्या टपाल फेऱ्या बंद कराव्यात जेणेकरून ते पूर्णवेळ शाळेला देतील.मला आठवतंय मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असताना जरेवाडी शाळेची २२ ही पटसंख्या आज ९०० पटसंख्या असलेली शाळा झाली आहे.याचे सर्व श्रेय हे या ठिकाणी असलेल्या शिक्षकांना आणि ग्रामस्थांना जाते असे सांगून आ.सुरेश धस म्हणाले की, ऊसतोड मजुरांच्या पाल्य विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे कारण शाळाबाह्य विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होत त्यामुळे याचे दुष्परिणाम होऊन शाळेची गुणवत्ता ढासळते शिवाय शिक्षणाचे प्रमाण कमी होते.हे आता कुठेतरी थांबले पाहिजे आणि मला विश्वास आहे माझ्या मतदार संघातील शिक्षक,केंद्रप्रमुख, बीईओ हा बहाद्दर आहे तो जरेवाडी शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येणे आणि १००% विद्यार्थ्यांना गणिताच्या क्रिया येणे हा जरेवाडी पॅटर्न यशस्वी करेल याची मला खात्री असल्याचेही आ.धस म्हणाले. जिल्हा परिषदेने नामांकित विद्यार्थी घडविले.याचे उत्तम उदाहरण म्हणजे अविनाश साबळे आहे प्रत्येक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती,आणि सरपंचांनी हा पॅटर्न राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त करून प्रत्येक शिक्षकाची शिकवण्याची पद्धत वेगळी आहे.विद्यार्थ्यांना जे आवडेल त्या पद्धतीने शिक्षकांनी शिकवले पाहिजे असे माझे मत आहे. ऊसतोड मजुरांची मुले असतील गोरगरिबांची लेकरं, दुर्बल घटकातील मुले शिकली पाहिजे हेच माझे ध्येय असल्याने जिल्हा परिषद शाळेसाठी जे करता येईल ते करण्याची माझी तयारी असल्याचेही धस शेवटी म्हणाले.यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने म्हणाले की जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांनी सकारात्मकतेने या पद्धतीने शिक्षण द्यावे चांगल्या कामाची दखल घेतली जाईल जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता अग्रेसर राहिली यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. ह भ प मधुकर शास्त्री महाराज,मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, डी आय इ टी संस्था धाराशिवचे प्राचार्य दयानंद जाटनुरे,गटविकास अधिकारी सचिन सानप, गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे,गटविकास अधिकारी संजय केंद्रे,गटशिक्षणाधिकारी यादव गटशिक्षणाधिकारी पिकवणे, राष्ट्रपती व आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सोमनाथ वाळके, श्रीमती कापसे शिक्षण विस्तार अधिकारी मनोज धस, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे, जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, भाऊसाहेब भवर,आदर्श सरपंच संदीप खकाळ व आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी उपक्रमशील व आदर्श शिक्षक व्ही रमणी पॅटर्नमध्ये यशस्वी काम केलेले सर्व शिक्षक शिक्षिका जरेवाडी डोंगर किनी अमळनेर व परिसरातील सुजाण पालक वर्ग तसेच ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्हारी शिंदे यांनी केले.

---

६० लाख लाडक्या

अर्जांची छाणणी सुरु केली आहे. पहिल्या टप्प्यात इतर शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची पडताळणी केली जात आहे. शेती अवजारांसाठी कृषी विभागाचे अनुदान, संजय गांधी निराधार योजना, नमो शेतकरी सन्मान योजना यासह इतर शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या कोणत्या महिलांनी लाडकी बहीण योजनेचाही लाभ घेतला, याची पडताळणी केली जात आहे. महिला आणि बालविकास विभागाने या योजना राबविणाऱ्या इतर विभागांकडून लाभार्थी महिलांची यादी मागवली आहे. या यादीची लाडकी बहीण योजनेच्या यादीशी पडताळणी केली जाणार आहे. तसेच महिलाआणि बालविकास विभागाने आयकर विभागाकडूनही माहीती मागवली आहे. म्हणजेच आयकर भरणाऱ्या कुटुंबातील महिलांची पडताळणी केली जाणार आहे. तसेच लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्यासही विभाग सांगणार आहे. यातून आयकर भरणाऱ्या कुटुंबातील महिलांची माहिती पुढे येईल, असेही महीला आणि बालविकास विभागाने म्हटले आहे. महिला आणि बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरतानाच सरकारने सर्व नियम स्पष्ट केले होते. तुम्हाला इतर योजनांमधून लाभ मिळत असतील तर फक्त फरक मिळेल. म्हणजेच पीएमकिसान-नमो सन्मान योजनेतून महिन्याला १ हजार मिळत असतील तर त्या महिलेला केवळ ५०० रुपये मिळतील. तसेच संजय गांधी निराधार योजनेतून १५०० रुपये मिळतात. त्यामुळे या महिलांना कोणताच लाभ मिळणार नाही. तसेच महिला आणि बालविकास विभागाने परिवहन विभागाकडून कोणत्या कुटुंबांकडे चार चाकी गाड्या आहेत त्याचीही यादी मागितली आहे. कारण लाडकी बहीण योजनेच्या निकषात चार चाकी गाडी असेल तर लाभ मिळणार नाही. म्हणजेच सरकार कुटुंबाकडे चारचाकी वाहन असताना कुणी लाभ घेत आहे का? याची पडताळणी करत आहे. अशा महिलांना वगळले जाणार आहे.

तिजोरीवरील भार घालविण्यासाठी

सरकार तिजोरीवर आलेला भार कमी करण्यासाठी अपात्र महिलांना बाहेरचा रस्ता दाखवणार आहे. सध्या २ कोटी ४६ लाख महिलांना महिन्याला १५०० रुपये दिले जातात. त्यासाठी वर्षाला ४२ हजार कोटी लागतील. सरकार एप्रिलपासून महिन्याला २१०० रुपये देण्याचा प्रयत्न करत आहे. त्यावेळी ६० हजार कोटी रुपये सरकारला खर्च करावे लागतील. हा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीला सहन करता येणार नाही. त्यामुळे सरकार नियमांवर बोट ठेऊन जास्तीत जास्त महिलांना योजनेच्या बाहेर करणार आहे.

निराधार योजनेच्या २५ लाख तर पीएम किसानच्या १८ लाख महिला

संजय गांधी निराधार योजनेतून राज्यातील २५ लाखांपेक्षा जास्त महिलांना महिन्याला १५०० रुपये दिले जातात. या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळले जाणार आहे. तसेच नमो शेतकरी सन्मान योजना आणि पीएम किसान योजनेतून १८ लाख १८ हजार महिलांना महिन्याला १ हजार रुपये मिळतात. या महिला देखील रडावर आहेत. तसेच डीबीटीद्वारे जवळपास १ लाख ७१ हजार महिलांना शेती अवजारे खरेदीसाठी कृषी विभागामार्फत अनुदान मिळाले आहे. या महिलाही सरकारच्या रडावर आहेत.

साडेसात कोटी लोकांनी

आता त्यांना ही संधी मिळाली आहे. त्यांनी सांगितले की, मी खूप उत्साहित आहे. मी अनेक वर्षांपासून महाकुंभात येण्याचे ठरवले होते. मात्र यावेळी अखेन मला तो योग जुळून आला. मी स्वत:ला सांगितले मी महाकुंभात जात आहे आणि मी इथे पोहोचलो आहे. भक्ती नरसिंम्हा स्वामी यांच्या शिवाय महाकुंभात आणखी परदेशी पर्यटकांनाही आपल्याकडे आकर्षित केल्याचे दिसून येत आहे. भक्तांसाठी महाकुंभात उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. भक्त इथल्या जेवणाच्या व्यवस्थेवरून देखील खूप समाधानी आहेत. सुरभी शोध संस्थान या समाजसेवी संस्थेकडून भक्तांसाठी फक्त नाश्त्याची व्यवस्था केलेली नाही तर त्यांच्या सेवेत अनेक कार्ये केली जात आहेत. यासारखे भंडारे भक्तांची सोय करत असल्याने भाविकांमध्ये समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. कारण अशा प्रकारे शुद्ध आणि सात्विक अन्नासाठी कोणालाही धावपळ करावी लागत नाही.

Daily Rajya Loktantra Date_18-01-2025

CHANGE IN NAME

MY OLD NAME WAS
OLD NAME - **MANOJ KAILAS RATHOD**
NEW NAME- **MANOJ KAILASH RATHOD**
ADDRESS-AT.RAMNAGAR TANDA .TQ. AMBAD,DIST.JALNA (431204) ,7666861799

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५

बीड : मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी बचत गटांच्या मिनी सरस प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी पत्रकारांशीही संवाद साधला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेव सोळंके, उमेदच्या संचालक सौ संगीता देवी पाटील, उमेद चे शेख शकील, जाधव, श्रीमती पवार आदिंची उपस्थिती होती.

अंबाजोगाईत आयएमएच्या वतीने एक दिवसीय आयएमएकॉन वैद्यकीय परिषद संपन्न - डॉ.घुगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात आयएमए अंबाजोगाईच्या वतीने रविवार दि.१२ जानेवारी रोजी स .९ ते सायं.५ या वेळेत एक दिवसीय आयएमएकॉएम वैद्यकीय परिषद मोठ्या उत्साहात व थाटात संपन्न झाली. या आयएमएकॉन मध्ये विद्यमान काळातील वैद्यकीय क्षेत्रातील बदल व तंत्रज्ञानाच्या सहकार्याने होत असलेली प्रगती यावर विचार मंथन पार पडले असल्याची माहिती आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी सांगितले.

अंबाजोगाई शहरातील हॉटेल पियुष इन या ठिकाणी आयएमएकॉन परिषदेचे आयोजन रविवार दि. १२ जानेवारी रोजी करण्यात आल. या आयएमएकॉन परिषदेला वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर,अधिव्याख्याते व इतर नामांकित डॉक्टरांनी मार्गदर्शन करून या परिषदेची उंची वाढवली. या परिषदेचे उद्घाटन आयएमएचे राज्याचे नियोजित अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी हे होते तर अध्यक्षस्थानी अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती. ग्रा.वै.रू. व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे हे होते तर व्यासपीठावर स्वा.रा.ती. रुग्णालयातील डॉ. अभिमन्यू तरकसे ,आयएमएचे अंबाजोगाई अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमएचे सांस्कृतिक विभागाचे सचिव डॉ.राजेश इंगोले, दंतरोग तज्ञ डॉ.नरेंद्र काळे,स्वा.रा.ती रुग्णालयातील स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ.गणेश तोंडगे,एम्पाच्या अध्यक्ष डॉ. सुलभा पाटील, आयएमएचे अंबाजोगाई सचिव डॉ .सचिन पोद्दार आदी मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेचे प्रास्ताविक डॉ.नवनाथ घुगे यांनी करताना सांगितले की, वैद्यकीय क्षेत्रात दिवसेंदिवस बदल होत असून ते बदल समजावून घेत आपण सुद्धा त्यामध्ये बदल करून घेण्याची गरज आहे. नवनवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान बाजारात येत आहेत त्याचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात इतर क्षेत्राप्रमाणे झपाट्याने बदल होत आहेत ते बदल स्वीकारून आपल्या परिसरातील रुग्णांचे योग्य व अचूक निदान व्हावे आणि उपचार व्हावेत यासाठी ही परिषद आयोजित केल्याचे डॉ.नवनाथ घुगे यांनी सांगितले. तर आयएमएचे नियोजित प्रांताध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी उद्घाटक म्हणून अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले बोलताना म्हणाले की, आयएमए ही संस्था देश पातळीवर काम करणारी संस्था आणि संघटन आहे. या संघटनेची कनेक्टिव्हिटी ही संपूर्ण जगाशी

आहे. जगभरात वैद्यकीय क्षेत्रात क्षेत्राला अनन्य साधारण महत्त्व आहे. जगाचे ज्ञान व होणारे बदल भारतातील डॉक्टर बांधवांना ज्ञात व्हावेत व त्यावर सर्वांनी काम करावे यासाठी अशा परिषदा मैलाचा दगड ठरत आहेत. अंबाजोगाईत आयएमएकॉन परिषदेच्या माध्यमातून तज्ञ व अभ्यासू आणि संशोधन करणाऱ्या निष्णात डॉक्टरांना निमंत्रित करून त्यांच्या या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात होत असलेले बदल आणि त्यावरील उपचार व उपाय अचूक व्हावे यासाठी ही परिषद महत्त्वाची आहे.आयएमए अंबाजोगाईने याबाबतीत पुढचे पाऊल टाकून उत्कृष्ट नियोजन आणि आयोजन करून सर्वसमावेशक अशी परिषद घेतली आहे.येणाऱ्या काळात वैद्यकीय क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केले.यावेळी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, डॉ.राजेश इंगोले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

सकाळी ९.३० वाजता कावीळ व पोटविकार या विषयावर लातुर येथील पोटविकार तज्ञ प्रविर गंभीरे यांनी मार्गदर्शन केले तर यात डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश तोंडगे, डॉ.अनिल भुतडा हे सहभाग नोंदविला. सकाळी १०.१५ वाजता रक्तदान या विषयावर अंबाजोगाई येथील हदयरोग तज्ञ डॉ.दिपक कटारे यांनी मार्गदर्शन केले यात डॉ.मधुकर कांबळे, डॉ.दिलीप नागरगोजे व डॉ.गोपाळ पाटील यांनी सहभाग. सकाळी ११ वाजता थायरॉईड विकार या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील अंर्तग्रंथी तज्ञ डॉ.निलेश लोमटे यांनी मार्गदर्शन केले यात परळी येथील स्त्रीरोग तज्ञ डॉ.शालीनीताई कराड, डॉ.वैशाली भावठाणकर, डॉ.संदिप थोरात यांचा सहभाग नोंदविला. दुपारी १२.३० वाजता मधुमेह या विषयावर मधुमेह तज्ञ डॉ.संजीव इंदुरकर यांनी मार्गदर्शन केले यात डॉ.शुभदा लोहिया, डॉ.प्रल्हाद गुरव, डॉ.सुनिल जाधव यांचा सहभाग घेतला . दू .२ वाजता रक्तक्षय व रक्तविकार या विषयावर रक्तविकारतज्ञ डॉ.मनोज तोष्णीवाल यांनी मार्गदर्शन केले यात डॉ.अमृता पाटील, डॉ.योगीनी थोरात, डॉ.शारदा इरपतगिरे हे सहभाग घेतला. दुपारी २.४५ वाजता मिरगी व मेंदु संदर्भातील विषयावर सोलापुर येथील मेंदुविकार या विषयावर गेली अनेक वर्षे सेवा देणारे डॉ.अश्विन वळसंगकर यांनी मार्गदर्शन केले तर यात डॉ.संजय चव्हाण, डॉ.वर्षा कस्तुरकर, डॉ.सचिन चौधरी हे सहभाग घेतला. दुपारी ३.३० वाजता वात विकार या विषयावर वात विकार तज्ञ डॉ.अमोल राऊत यांनी मार्गदर्शन केले तर यात डॉ.अनिल मस्के, डॉ.सारिका शिंदे, डॉ.रचना जाजु आदीनी सहभाग घेतला. दुपारी ४.१५ वाजता हदयविकार संबंधी लातुर येथील प्रसिद्ध हदयरोगतज्ञ डॉ.संजय शिवपुजे यांनी मार्गदर्शन केले यात डॉ.अनुप पाटील, डॉ.मनिषाताई फड, डॉ.राहुल धाकडे, डॉ.राजेश पाटील यांनी सहभाग घेतला.ही आयएमएकॉन परिषद यशस्वी करण्याठी डॉ. नवनाथ घुगे, डॉ अनिल भूतडा,डॉ सचिन पोतदार,डॉ नितिन चाटे, डॉ. अरुणा केंद्रे अध्यक्ष महिला आघाडी, डॉ. विनोद जोशी, डॉ निलेश तोष्णीवाल, डॉ. सुधीर धर्मपात्रे, डॉ. अतुल शिंदे, डॉ. राजश्री धाकडे, डॉ. स्नेहल होळंबे, स्त्री रोग विभागातील सर्व डॉक्टर्स, आय. एम.ए. व अम्पाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी प्रयत्न केले.

गुन्हा दाखल होण्यापुर्वीच आठ आरोपींना घेतले ताब्यात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पोलीस स्टेशन अंभोरा हद्दीत दि. १६.१०.२०२५ रोजी रात्री १०.०० वा चे सुमारास मौजे वाहिरा येथे हातोळण व वाहिरा येथील पारधी समाजातील लोकांमध्ये आपआपसात भांडण होवुन दोन व्यक्ती जागीच मयत झाले बाबतची माहिती सपोनि श्री. मंगेश साळवे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अंभोरा यांना मिळाल्याने सपोनि श्री. मंगेश साळवे साहेब यांनी सदरची माहिती मा. पोलीस अधिक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बाळकृष्ण हनपुडे पाटील साहेब यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सोबत पोउपनि चंद्रकांत तावरे, पोलीस हवालदार-बाबासाहेब गर्जे, मनोजकुमार खंडागळे, बाबुराव तांदळे, भरत माने, दत्तात्रय टकले, लुईस पवार, पोलीस अंमलदार-शिवदास केदार, सुदाम पोकळे, अमोल सिरसाट, सतिष पैठणे यांचे दोन पथक तयार करुन तात्काळ घटनास्थळी भेट दिली असता दोन ईसम रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले होते. तसेच एक इसम गंभीर जखमी असल्याने त्यास अहिल्यानगर येथे उपचार कामी पाठविले आलेले आहे. सदर घटनेतील मयताचे नावे १) अजिनाथ विलास भोसले २) भरत विलास भोसले असे असुन गंभीर जखमी असलेल्या इसमाचे नाव कृष्णा विलास भोसले रा. हातोळण ता. आष्टी जि.बीड असे आहेत. तसेच घटनास्थळी गेल्यानंतर मयत/जखमींचे नातेवाईकांकडे विचारपुस केली असता सदरची घटना हि जुन्या वादाचे कारणावरुन झाल्याचे समजले. तसेच यातील मयत इसम व जखमी इसम व आरोपी यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी असुन त्यांचेवर जबरी चोरी, दरोडे असे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन सपोनि श्री. मंगेश साळवे साहेब यांनी अंभोरा पोस्टेचे दोन पथके तयार करुन तात्काळ परिसरातुन गोपनीय माहिती घेवुन आरोपींचा शोध घेणे कामी रवाना केले असता गुन्हयातील आठ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दिंद्रुड जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी

सावित्री-जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या-मुलांची) शाळेत दिंद्रुड केंद्रांतर्गत १४ शाळेच्या पहिली ते आठवी पर्यंत च्या विद्यार्थ्यांच्या भाषण स्पर्धा गुरुवारी पार पडल्या. विजेत्या स्पर्धकांचा गोल्ड मेडल, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमा पूजन व दिप ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे तर प्रमुख अतिथी देवदूत प्रतिष्ठान चे अध्यक्ष बंडूजी खांडेकर सह

केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मंचक सोळंके,संजय हंगरगे, सचिन जोगदंड, व्यंकटेश करे,परशुराम कटारे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, उपाध्यक्ष अंगद तांबे, दिंद्रुड पत्रकार संघ व लोकशक्ती विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास निकाळजे यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्रातील १४ शाळेच्या २८२ विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा दिली. त्यापैकी पहिली ते आठवी च्या विद्यार्थ्यांमध्ये प्रत्येकी प्रथम, द्वितीय, तृतीय अशा २४ विजेत्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तर भाषण स्पर्धेत एकूण एकशे सात विद्यार्थ्यांनी सावित्री- जिजाऊ- विवेकानंद यांच्या थोर विचारांवर सुंदर भाषणे केली. या १०७ विद्यार्थ्यांपैकी तीन गटातून प्रथम, द्वितीय, तृतीय अशा एकूण नऊ विजेत्या स्पर्धकांची निवड करण्यात आली. विजेत्या स्पर्धकांत शिवराज चव्हाण, अनन्या गरड, पल्लवी गायकवाड, आलीया शेख, अस्मिता साबळे, आरोही देशमाने, स्वरांगी क्षीरसागर, रोहिणी मुंडे, हर्षदा वाघ, सिद्धी कोल्हे, राधिका कोल्हे या विद्यार्थ्यांना व सामान्य ज्ञान स्पर्धेतील २४ विद्यार्थ्यांना गोल्डमेडल, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेदरम्यान ज्येष्ठ पत्रकार प्रकाश काशीद, संतोष स्वामी, अमोल ठोंबरे यांनी परीक्षकाची भूमिका निभावली. दिंद्रुड केंद्रातील १४ शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकांची यावेळी उपस्थिती होती. विशेष म्हणजे आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धां व भाषण स्पर्धेचे आयोजन या सर्व शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकांनी स्वखर्चाने केले होते. बाभळगाव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मनोहर कटारे,सहशिक्षक सिध्देश्वर बोकन, सुभाष क्षिरसागर, अशोक कोपले,सुमंत कटारे,पांडूरंग कटारे, नवनाथ दुधाळ, ज्ञानेश्वर पवार, प्रमोद कोल्हे, रामकिसन चाटे, पांडुरंग वाकसे, अनंत काटुळे, महेश चौधरी,सारिका फुलमाळी,प्रगती देशपांडे सह केंद्रातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका राधिका गडदे व मीरा फपाळ, प्रास्ताविक मनोहर कटारे यांनी तर आभार नवनाथ दुधाळ यांनी मानले. जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी घेतलेल्या या आदर्श उपक्रमाबद्दल पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी, प्रतिष्ठित व पालकवर्गातून कौतुक होत आहे.

पूनम वरोडे यांना मैत्रा फाउंडेशनचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

मैत्रा फाउंडेशन च्या २०२४-२५ वर्षातील राज्यस्तरीय शिक्षण महर्षी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवडीफाटा ता. वडवणी येथील आदर्श शिक्षिका श्रीमती.पूनम अनिल वरोडे यांची निवड झालेली आहे. या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

मैत्रा फाउंडेशन, महाराष्ट्र याच्या कडुन साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण व सेवा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना प्रतिवर्षी राज्यस्तरीय शिक्षण महर्षी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षीचे पुरस्कार जाहीर झाले असून.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवडीफाटा येथील प्राथमिक शाळेच्या आदर्श शिक्षिका श्रीमती.पूनम अनिल वरोडे मॅडम यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत धडपडणे,आनंददायी अध्यापन आणि अध्यापनात विविध शैक्षणिक साहित्याचा कौशल्यपूर्ण उपयोग,विविध उपक्रमातून मनोरंजक अध्यापन अशा प्रकारच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी ची दखल घेत संस्थेने वरोडे यांना या वर्षीचा राज्यस्तरीय शिक्षण महर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे. यापूर्वी ही त्यांना रोटरी क्लब ऑफ बीड च्या वतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. दि.१९ रोजी सकाळी १० वा.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,बीड. येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. शिक्षिका वरोडे मॅडम यांच्या शिरपेच्यात राज्यस्तरीय शिक्षण महर्षी पुरस्काराचा आणखी एक मानाचा तुरा रोवल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

अतिवृष्टी अनुदानातून मंठा तालुका वगळल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी

जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्याला पुन्हा वाटाण्याच्या अक्षता लावण्याचे काम शासनाच्या महसूल विभागाने केले आहे. याला जबाबदार आमदार असल्याचे बोलल्या जात आहे.याअगोदर ज्याप्रमाणे पीक विमा भेटला नव्हता, त्याप्रमाणेच आता मंठा मंडळ अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात नाराज झाला आहे. अगोदरच शेतीमालाला भाव नाहीत, रासायनिक खताचे भाव कडाडलेले आहेत. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले असूनही पुन्हा मंठा मंडळातील शेतकरी अनुदानापासून वंचितच राहणार आहे. यामुळे शेतक्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसण्याचे ठरविले आहे. मंठा तालुक्यात सप्टेंबर २०२४ या महिन्यात अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे शेतक्यांचे मोठे नुकसान झाले झाले होते. या बाबत वरिष्ठ अधिकारी पदाधिकारी तसेच आमदार, खासदार आणि विरोधी पक्ष नेते यांनी देखील मंठा तालुक्यातील, मंठा मंडळातील बहुतांश गावांना भेटी दिल्या. पंचनामे झाले. सरासरी मदत शानाकडून देण्यात येईल, असे अश्वासन दिले होते. परंतु सत्ताधारी, विरोधकांचे दौरे सगळे मंठा येथील तहसीलदार सोनाली जोंधळे यांना निवेदन सादर करताना नुकसानग्रस्त शेतकरी. फफोल ठरले असून शेतक्यांच्या पदरी शेवटी निराशाच आली आहे. त्यामुळे शेतक्यांनी आता आंदोलनाची हत्यार उपसण्याचे ठरविले आहे. याबाबत मंठा तहसीलदार यांना निवेदन देखील दिले आहे. शासनाकडून नुकतीच सदरील नुकसानीची यादी जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये मंठा मंडळ

वगळण्यात आले आहे. ही मोठी दुर्देवी बाब आहे. आम्हा शेतक्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. परंतू शासनाने कोणते निकष लावले आहेत. की ज्यामध्ये मंठा मंडळ वगळण्यात आले आहे. त्यामुळे मंठा तालुक्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत. मंठा मंडळाचा तात्काळ समावेश करण्यात यावा. नसता तहसील कार्यालयासमोर मंठा मंडळातील शेतक्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. या निवेदनावर दत्तात्रय बोराडे, महादेव बोराडे यांच्यासह शहरातील अनेक नागरिकांच्या स्वाक्ष्या आहेत. दरम्यान, या संदर्भात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला जाईल, असे तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी सांगितले.

जय -पराजय हा जीवनातील अविभाज्य घटक -शिंदे

जालना । प्रतिनिधी

मॉडर्न इंग्लिश स्कूल विठ्ठल पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर क्रीडा सप्ताह निमित्त क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन नायब तहसीलदार संजय शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या भव्य मैदानावर उत्साहाच्या वातावरणात झालेल्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग खराबे पाटील होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे माजी उपसभापती अंकुशराव कदम ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष प्रसाद गडदे तालुका काँग्रेसचे अध्यक्ष निळकंठ वायाळ पररे युवा खेळाडू प्रतीक भैया खराबे यांची प्रमुख उपस्थिती होती मान्यवरांच्या हस्ते विजयी खेळाडूंचा

सत्कार करण्यात आलायावेळी सरस्वतीचे पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना नायब तहसीलदार संजय शिंदे म्हणाले आयुष्यामध्ये यश आणि अपयश पचवण्याची ताकद खेळामुळे येते यावेळी खेळाचे महत्व क्रीडाप्रेमी प्रसादराव गडदे यांनी सांगितले आयुष्य आनंद जगण्यासाठी खेळाला अन्य साधारण महत्त्व असून क्रिकेट प्रेमी कबड्डी प्लेयर कुस्तीपटू आजही उत्साहाच्या वातावरणामध्ये जीवन जगत आहेत त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे असे ते म्हणाले यावेळी कबड्डी खो-खो लांब उडी उंचवडी रनिंग फुटबॉल हॉलीबॉल अधी स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

वा.ल.कुलकर्णी यांनी मराठी समीक्षेला नवी दृष्टी दिली -प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत वा. ल. कुलकर्णी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेची सुरुवात राजमाता जिजाऊ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. बलभीम महाविद्यालय बीड येथील मराठी विभाग प्रमुख तथा सदस्य, मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट यांनी प्रमुख वक्ते म्हणून विचार व्यक्त करताना वा. ल. कुलकर्णी यांनी मराठी समीक्षेला नवीदृष्टी दिली. पारंपरिक समीक्षा विचाराला नवा आयाम देऊन साहित्य व्यवहाराला आधुनिक पद्धतीने विचार करण्यास प्रवृत्त केले. मराठीतील पहिले तात्विक समिक्षेचे टीकाकार होते. मराठी भाषेबरोबरच इंग्रजी भाषेचे ज्ञान सखोल होते. त्यामुळे त्यांची विलायती वाल अशी ओळख निर्माण झाली. वाङ्मयातील सत्याच्या संशोधनाचे कार्य अखंड असते त्याला शेवट नाही. या तत्त्वाने त्यांनी समीक्षा लेखन केले. त्यांचे लेखन हे वाङ्मयातील प्रश्नांच्या उत्तरासाठी, शोधासाठी

असल्याने त्याच्या समीक्षा लेखनाच्या स्वरूप स्फूट राहिले. याबरोबरच त्यांनी प्राचीन मराठी समीक्षेत मोलाची भर घातलेली आहे. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी वा. ल. कुलकर्णी व्याख्यानमालेच्या माध्यमातून मराठी साहित्यातील समीक्षकाची ओळख झाली. मराठी साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून साहित्य समीक्षेचे स्थितीज विस्तारण्याचे कार्य केले. साहित्य निर्मिती आणि समीक्षा या दोन्हीही परस्पर विरोधी प्रक्रिया आहेत. लेखकाने व्यक्त केलेले जीवन कलावादी की जीवनवादी या विषयी स्वतंत्र भूमिका घेऊन वा. ल. कुलकर्णी यांनी जीवनवादी भूमिकेला महत्त्व दिले. समीक्षा हा न संपणारा शोध असतो. ज्ञानाचा यज्ञ अखंडपणे चालत राहावा यासाठी ते शिकवण्यासाठी काढलेली टिपणे नंतर फाडून टाकत असत. साहित्यातून अधोरेखित झालेल्या जीवनाला तटस्थ पद्धतीने अभ्यासून त्याची समीक्षा करणे म्हणजे निर्मितीची पुनर्निर्मिती करणे असते असे मत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठ्ठल केदारी यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकातून व्याख्यानमालेच्या आयोजना विषयीची भूमिका सांगितली. या प्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नागोराव वाघमारे यांनी तर आभार प्रा. विनायक कापावार यांनी मानले.

पान ६ वरून...

जीवनात आनंदी राहण्यासाठी

गेवराई येथे संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठान, गेवराई यांच्या वतीने संत भगवानबाबा व संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरु असलेल्या भव्य कीर्तन महोत्सवात मंगळवारी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची कीर्तनसेवा झाली. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या एक तत्त्व नाम दृढ धरीं मन । हरिसि करुणा तूझी ।।१।। तें नाम सोपारें राम कृष्ण गोविंद । वाचेसीं सद्गद जपें आधीं ।।२।। नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिका पंथा जासी झणें ।।३।। ज्ञानदेव मौन जप-माळ अंतरीं, धरोनि श्रीहरि जपे सदा ।।४।। या अभंगावर चिंतन केले. देव मिळवायचा असेल तर तत्व पाळा त्याशिवाय पर्याय नाही. संत भाऊ- बाबा समाजाच्या हितासाठी सतत भजन, कीर्तन, व देवाचे नामस्मरण करुन ब्रम्हरुप होवून देव झाले. संत भाऊ-बाबा यांनी जीवनात तत्व पाळले म्हणून त्यांच्या पुण्यतिथीचा हा भव्य सोहळा गेल्या २० वर्षांपासून येथे होतो आहे. भागवत धर्माचे हेच खरे काम आहे, देवाचे

भजन करुन पुण्य कमवा. काटे सहन करायला शिका सिध्द व्हाल अहंकार करु नका. लोकांना तीन गोष्टी लागतात स्वार्थ, पैसा आणि मान तर वाझ झाडांचे नाव संसार आहे म्हणून संसारात अडकून न राहता भक्ति भावाने ज्ञान मंडपात येवून स्थिर व्हावे तसेच शास्त्र सोडून वागणारे लोक सुखी राहू शकत नाहीत. तसेच शरिराला जपा, आपल्यामुळे सर्व आहे. याचा विचार करा शरिर सांभाळा शरिर हिच खरी संपती आहे. पोरांनो नवीन जमीन घेवू नका परंतु बापाची जमीन मात्र विकू नका. शुध्द शाकाहार घ्या अन्? घरचं खा. सध्या अपघाताचे प्रमाण वाढले कारण दारु पिऊन गाडी चालवणाऱ्याचे प्रमाण वाढले आहे. तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढत चालली आहे. १८ ते २२ वर्षाचे पोरं दारु पिवून अपघातात जातात हे दुर्देव आहे. पाठीमागे कुटुंबाचे खूप हाल होतात. म्हणून तरुणांनो दारु पिवून आयुष्य बरबाद करण्यापेक्षा अभ्यास तसेच उद्योग, व्यवसाय करुन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी त्यांना संगीत विशारद तुळशीराम म.आतकरे, रामनाथ म.सालपे, इंद्रजित म. येवले, नाना म. कवडे यांच्यासह आर्दीनी साथ दिली. मृदंगाचार्य नामदेव म.बेदरे व अजय म.काळे यांनी मृदंग साथ दिली तर हार्मोनियमवर राजेंद्र काळे यांनी संगीत साथ दिली. यावेळी गेवराई शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आ.संदीप क्षीरसागरांची

करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले होते. यावर आता तहसिलदार यांनी आदेश काढले आहेत. दि.२२ जानेवारी ते ३१ जानेवारी या काळात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात असे शिबीर घेण्यात येणार आहेत. दरम्यान आ.संदीप क्षीरसागरांच्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेचा फायदा ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

२१ जानेवारीला शेतकरी करणार दिल्लीकडे कूच ; आंदोलन तापण्याची शक्यता

नवी दिल्ली : हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी हरियाणा-पंजाब सीमेवरील आंदोलन तीव्र होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. शेतकरी नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. २१ जानेवारी रोजी १०१ शेतकऱ्यांचा जथ्था शंभू सीमेवरून दिल्ली कूच करणार असल्याची घोषणा किसान मजूर मोर्चाचे नेते सरवण सिंह पंढेर यांनी दिला आहे. त्यामुळे शेतकरी आंदोलन पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे.

यापूर्वी डिसेंबर महिन्यात तीन वेळा शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांसोबत दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. परंतु हरियाणा पोलिसांनी आंदोलक शेतकऱ्यांना सीमेवरच रोखलं होतं. शेतकऱ्यांवर अश्रुधारा नळकांड्याचा वापर करत शेतकऱ्यांना माघार घ्यायला भाग पाडण्यात आलं होतं. परंतु शेतकरी हमीभाव कायद्याच्या मागणीवर ठाम आहेत. हमीभाव कायद्यासाठी पंढेर यांनी पंतप्रधान मोदींना इशारा दिला आहे. पंढेर म्हणाले, ''पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळातच आम्ही हमीभाव कायदा मंजूर करून घेऊ. तसेच शेतकऱ्यांची सर्व मागण्या त्यांच्याकडून

देशहितासाठी मान्य करून घेतल्या जातील.'' असा इशाराही पंढेर यांनी दिला आहे. शेतकरी नेते जगजितसिंह डल्लेवाल यांच्या उपोषणाकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत असल्याने शेतकरी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

शेतकरी नेते जगजितसिंह डल्लेवाल यांच्या उपोषणाचा शुक्रवारी (दि.१७) ५३ वा दिवस होता. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालवत आहे. परंतु सरकार दखल घेत नाही. केंद्र सरकारच्या या वृत्तीचा निषेध करण्यासाठी बुधवारपासून १११ शेतकऱ्यांनी खनौरी सीमेवर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांचे नेतृत्व सुखजित सिंह हरदोझडे करत आहेत. हरदोझडे म्हणाले, ''डल्लेवाल यांच्या उपोषणाकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे आम्ही डल्लेवाल यांच्या समर्थनार्थ १११ शेतकऱ्यांनी शांततेत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आमचा संघर्ष सुरूच राहील.'' अशी भूमिका माध्यमांसमोर मांडली. दरम्यान, मागील ११ महिन्यांपासून शंभू आणि खनौरी सीमेवर शेतकरी आंदोलन सुरू आहे. केंद्र सरकारचा निषेध करत हमीभाव कायद्याची मागणी शेतकरी करत आहेत. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करू, असं सांगितलं होतं.

काळ्या टोमॅटोची शेती

राज्यात आणि देशात कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत आहेत. बऱ्याचदा एखाद्या फळाचा रंग हा ठराविक मानला जातो. जसे की, टोमॅटोचा रंग हा लाल असतो. टोमॅटोचा लाल रंग असणे हे फारच सर्वसामान्य बाब आहे. मात्र काळे टोमॅटो कधी ऐकले का? कदाचित नसेल ऐकले पण काळ्या रंगाचे देखील टोमॅटो असतात. या टोमॅटोमधून के, सी, ए हे जीवनसत्त्व असते. यामुळे हे टोमॅटो आहारात असावे. तसेच ब्युटी प्रॉडक्टसाठी देखील त्याचा फायदा होतो.

काळ्या टोमॅटोची शेती ही इंग्लंडमध्ये सुरुवात झाली. याला इंडिगो रोज टोमॅटो नावाने ओळखले जाते. यालाच युरोपमध्ये सुपरफुड असे देखील म्हणत आहेत. तसेच या काळ्या टोमॅटोसाठी उष्ण वायूची आवश्यकता असते. भारतात बऱ्याच ठिकाणी उष्ण वायू असलेले वातावरण पहायला मिळते. यामुळे लाल टोमॅटोहून काळ्या टोमॅटोला अधिक मागणी आहे.हिमाचल प्रदेशात काळ्या टोमॅटोची लागवड : सर्वात आधी टोमॅटोची शेती ही इंग्लंड या देशात केली जात होती. इंडिगो रोज टोमॅटो नावाने इंग्लंडमध्ये ओळखले जात असून युरोपमध्ये याला सुपरफूड असे देखील म्हणातात. मात्र आता याच काळ्या टोमॅटोची लागवड ही भारतातील हिमाचल प्रदेशात केली जात आहे. यासाठी विदेशातून काळ्या टोमॅटोचे बीज मागवण्यात आले आहे. यानंतर टोमॅटोची लागवड केली गेली.

जानेवारी हा महिना लागवडीसाठी उत्तम : काळ्या टोमॅटोची लागवड करण्यासाठी जानेवारी हा महिना फार महत्वपूर्ण आहे. याची लागवड केल्यानंतर तीन महिने झाले की टोमॅटो येऊ लागतात. त्यानंतर अंदाजे एप्रिलपर्यंत लागवड करता येऊ शकते. एक हेक्टर एवढं जरी उत्पादन मिळवलं तरीही चार लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळतं. यामुळे आता लाल टोमॅटोहून काळ्या टोमॅटोची किंमत ही अधिक असून भाव १०० ते १५० रुपये किलो दर मिळतो.

शेळ्या मेंढ्यातील आंत्रविषार; जाणून घ्या लक्षणे आणि उपचार

शेळ्या मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय करणे फारच गरजेचे आहे.

आंत्रविषार आजाराची लक्षणे : शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात. ज्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे इत्यादी लक्षणे दिसतात. शेवटच्या टप्पात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार आजारावर उपचार : हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.

दिन विशेष

जागतिक दिवस
जागतिक धर्म दिन

महत्वाच्या घटना

१७७८ : कॅप्टन जेम्स कूक हा हवाई बेटांवर पोचणारा पहिला युरोपियन बनला.
१९११ : युजीन बी. इलायने सानफ्रान्सिस्कोच्या बंदरात उभ्या असलेल्या यु. एस. एस. पेनसिल्व्हेनिया या जहाजावर विमान उतरवले. जहाजावर विमान उतरण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.
१९५६ : संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी मुंबईत ११४ वेळा गोळीबार
१९६४ : न्यूयॉर्क येथे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे भूमिपूजन झाले.
१९७४ : इजिप्त व इस्त्राएल यांच्यात शांतता करारावर सह्या झाल्या.
१९९७ : नोर्वेच्या बोर्ग आऊसलंडने एकट्याने व कोणाच्याही मदतीशिवाय अटलांटिक महासागर पार केला.
१९९८ : मदनमोहन पूंछी यांनी भारताचे २८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९९ : नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
२००५ : एअरबस ए-३८० या जगातील सर्वात मोठ्या प्रवासी विमनाचे अनावरण करण्यात आले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : महाराष्ट्रातील एक प्रजाहितदक्ष पण दुर्दैवी राजे प्रतापसिंह भोसले यांचे निधन. छत्रपती शाहू (दुसरे) यांचे ते थोरले चिरंजीव होत. पेशवाईच्या अस्तानंतर माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांनी पुन: त्यांना छत्रपतींच्या गादीवर बसवले. पाठशाळा आणि संस्कृत व मराठीबरोबरच इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला त्यांनी उत्तेजन दिले. (मृत्यू:४ आक्टोबर१८४७)
१८३३ : अमेरिकन संशोधक रे डॉल्बी यांचा जन्म.
१८४२ : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे समाजसुधारक, धर्मसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व न्यायाधीश (मृत्यू:१६ जानेवारी१९०९)
१८५४ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांचा मदतनीस तसेच त्यांचा पहिल्या दुरध्वनी संभाषणातील भागीदार थॉमस वॉटसन यांचा जन्म.
१८८९ : देवनहळ्ळी वेंकटरामनय्या गुंडप्पा तथा डी. व्ही. जी. कन्नड कवी व विचारवंत (मृत्यू:७ आक्टोबर१९७५ बंगळुरू, कर्नाटक)
१८८९ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' - नाट्यछटाकार (मृत्यू:१ आक्टोबर १९३१)
१८९२ : अमेरिकन अभिनेता ऑलिव्हर हार्डी यांचा जन्म.
१९३३ : जगदीश शरण वर्मा - भारताचे २७ वे सरन्यायाधीश (मृत्यू:२२ एप्रिल २०१३)
१९५२ : वीरप्पन - चंदन तस्कर (मृत्यू:१८ आक्टोबर २००४)
१९६६ : अलेक्झांडर खलिफमान - रशियन बुद्धिबळपटू
१९७२ : विनोद कांबळी - भारतीय क्रिकेटपटू
१९९५ : साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ वि. द. घाटे यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : आत्माराम रावजी भट - कृतिशील विचारवंत, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे संस्थापक (जन्म:१२ मे१९०५)
१९३६ : रुडयार्ड किपलिंग - नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश लेखक (जन्म:३० डिसेंबर १८६५)
१९४७ : कुंदनलान सैगल - गायक व अभिनेते (जन्म:११ एप्रिल १९०४)
१९६७ : कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचे निधन.
१९७१ : भारीतय वकील आणि संसद सदस्य बॅरीस्टर नाथ पै यांचे निधन.
१९९६ : एन. टी. रामाराव - तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री (जन्म:२८ मे १९२३)
२००३ : हरिवंशराय बच्चन - हिन्दी कवी (जन्म:२७ नोव्हेंबर १९०७)
२०१५ : शकुंतला महाजन तथा 'बेबी शकुंतला' - लोभसवाणे रूप, शालीन सौंदर्य आणि कसदार अभिनयाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत अमीट अशी मुद्रा उमटविणाऱ्या अभिनेत्री.

भुईमूग खत व्यवस्थापन

भुईमुग हे तेलबिया वर्गीय पिकामध्ये एक महत्वाचे पिक असुन खरीपात या पिकाखाली महाराष्ट्रात २.३६ लाख हे क्षेत्र असुन त्यापासुन २.१७ लाख टन उत्पादन आणि ९६७ क्विं/हे एवढी उत्पादकता मिळाली. उन्हाळी हंगामात हे पिक ०.८५० लाख हे क्षेत्रावर घेतले होते व त्यापासून १.१७ लाख टन उत्पादन मिळाले आणि उत्पादकता १३७४ क्विं/हे अशी होती.जमीन :मध्यम, भुसभुशीत, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.पूर्व मशागत :एक नांगरट व दोन-तीन कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.

पेरणीची वेळ : खरीप :१५ जून ते १५ जुलै उन्हाळी - १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, पेरणीचे वेळी रात्रीचे किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

बियाणे : भुईमूगाचे वाणनिहाय बियाणे प्रति हेक्टरी खालीलप्रमाणे वापरावे. १०० किलो : एसबी - ११, टीएजी - २४, टीजी - २६, जेएल-५०१, फुले-६०२१ १२० ते १२५

किलो: फुले प्रगती, फुले व्यास, टीपीजी-४१, फुले उनप, फुले उन्नती, फुले भारती.

बीजप्रक्रीया : बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेन्डॅझिम किंवा ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे.

पेरणी अंतर : दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर १० सें.मी.ठेवावे. उन्हाळी हंगामात जमीन ओलवून नंतर वापशावर पाभरीने

अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बियाणे कमी लागुन उगवण चांगली होते.

आंतरपिके : खरीप भुईमूग पिकात सोयाबीन, सूर्यफुल, तीळ, मूग, उडीद, तूर ही आंतरपीके ६:२ या प्रमाणात भुईमूग + ज्वारी १:१ तर कपाशी १:१ या प्रमाणात घ्यावी. आंतरपिकांमुळे अधिक आर्थिक फायदा होत असल्याचे प्रयोगाअंती दिसून आलेले आहे.

भुईमूग + सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) केल्यास पाने खाणारी अळीचे नियंत्रणास मदत होते. सुरु ऊसात उपट्या भुईमुग वाणाची आंतरपिक म्हणून लागवड करण्यासाठी ९० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून ऊसाची लागवड केल्यानंतर एक आठवड्याने १० सें.मी. अंतरावर सरीच्या दोन्ही बाजूस उन्हाळी भुईमुगाची लागवड करावी. भुईमूग + तीळ (४:१) या प्रमाणात आंतरपिक घ्यावे.

खत मात्रा : पुर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या अगोदर प्रति हेक्टरी १० टन कंपोस्ट किंवा चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळून द्यावे. पेरणीच्या वेळेस २५ किलो नत्र + ५० किलो स्फुरद द्यावे.

खत व्यवस्थापन (सुधारीत शिफारशीनुसार २०१३) भुईमुगाच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खत मात्रे सोबत जिप्सम ४०० कि/हे (२०० कि/हे पेरणीवेळी तर उर्वरीत २०० कि/हे आऱ्या सुटतांना) जमिनीत मिसळुन द्यावे. महाराष्ट्रातील हमखास पावसाच्या विभागातील (२०१५ ची सुधारीत शिफारस) मध्यम काळ्या जमिनीत उन्हाळी भुईमुगाच्या अधिक उत्पादन, पाण्याचा व खतांचा कार्यक्षम वापर तसचे अधिक फायद्यासाठी ५ टन शेणखत प्रति हेक्टर पुर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या अगोदर द्यावे. शिफारस खतमात्रेच्या १०० टक्के खते (२५:५०:०० नत्र, स्फुरद, पालाश किलो/हे.) विद्राव्य स्वरूपात ठिबक सिंचनातुन ९ समान हप्त्यात द्यावे.

आंतर मशागत : पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत. १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ निंदण्या (खुरपण्या) द्याव्या. शेवटची कोळपणी थोडी खोल द्यावी त्यामुळे पिकास मातीची भर मिळते.भुईमूगाच्या आऱ्या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये. भुईमुगातील कार्यक्षम तण व्यवस्थापनाकरीता पेरणीनंतर लगेच पेंडीमिथॉलिन १.०० किलो क्रि.घ. प्रति हेक्टरी १० लिटर पाण्यातुन ओलीवर फवारणी करावी. तसेच पेरणीनंतर तणांच्या बंदोबस्तासाठी २०-२५ दिवसांनी परसुट किंवा टरगासुपर १५ मिली व्यापारी उत्पादन/ हे १० लिटर पाण्यातून द्यावे .

पीक संरक्षण : टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुभाव झाल्यास २५ ग्रॅम मॅन्कोझेब (डायथेन एम-४५) + २५ ग्रॅम बाविस्टीन १० लि. पाण्यात मिसळून फवारावे. भुईमुग पिकावरील रस शोषणाऱ्या किडिंसाठी मिथिल डिमेटॉन २५ ई.सी. १० मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पाने खाणारी अळी, तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळी, अमेरिकन बोंड अळी यांचे बंदोबस्तासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली किंवा क्लोरपायरिफॉस २० % प्रवाही २५ मिली १० ली. किंवा सायपरमेथ्रीन २५ ईसी ४ मिली १० लि. पाण्यात फवारावे.

काढणी व उत्पादन : पीक तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. अशा प्रकारे पीक तयार झाल्यावर काढणी करावी. वरील तंत्रज्ञानाचा वापर केल्यास खरीपात सरासरी १८ ते २० क्विंटल/हेक्टर तर उन्हाळी भुईमूगाचे २५ ते ३० क्विंटल/हेक्टर उत्पादन मिळू शकते.

करवंदापासून गुलाबी चेरीची निर्मिती; कंपनी थेट शेतातून विकत घेते फळं

राज्यातील शेतकरी कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करत आहेत. यापासून ते अधिकाधिक उत्पन्न मिळवतात. शेतकरी कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करत असताना जोखीम घेत असतात. मात्र हीच जोखीम भविष्यात कुठे तरी यशाच्या शोधात आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे ही शेती फारशी खर्चिक नाही. कमी पाणी आणि फवारणीची फारशी गरज नसल्याने ही शेती परवडणारी आहे. करवंदाचे झाड लावल्यानंतर तीन वर्षांनंतर फळे यायला सुरुवात होतात. तसेच पुढील ३० वर्षांपर्यंत कसलीही चिंता करू नये. ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यापर्यंत करवंद फळ झाडावरून काढले जात असून ते शेतातून खरेदी करून महाराष्ट्रातील आणि देशातील काही कंपन्यांमध्ये विक्री केली जाते.

या ठिकाणच्या कंपन्या करवंद फळाची शेतीतून करतात खरेदी : दिल्ली, जळगाव, मुक्ताईनगर, गुजरात येथीप काही कंपन्या करवंद हे फळ शेतातून खरेदी करून घेऊन जातात. या पिकात आंतरपिकाची देखील लागवड करता येते. मोकळ्या जागेत सोयाबीन, गहू, हरभरा हे आंतरपीक घेता येते.

अखेर शालेय विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशाची प्रतिक्षा संपली

प्रजासत्ताक दिन नविन गणवेशात होणार साजरा › **सरकारला ऊशिरा का होईना शहाणपण सूचले** › **गणवेशाची जबाबदारी शालेय व्यवस्थापनावर**

बीड। प्रतिनिधी

समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील सर्व मुली, अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०२४-२५ मध्ये ''एक राज्य एक गणवेश '' योजना राबविण्यात आली. यात अनेक मुलांना स्वातंत्र्य दिन जुन्या गणवेशावर साजरा करावा लागला तर दिवाळीनंतर शैक्षणिक सत्र सुरू होऊन दोन महिने उलटूनही दुसऱ्या गणवेशाची प्रतिक्षा होती. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच गणवेशाचे कामकाज शालेय व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश मिळेल यासाठी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा दिला होता.त्यानंतर शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दीड कोटीचा निधी सीईओंच्या मान्यतेने गटशिक्षणाधिकारी यांना पीएफएमएस प्रणाली द्वारे वर्ग करण्यात आला आणि आज अखेर शालेय

विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळाला आहे.त्यामुळे प्रजासत्ताकदिन विद्यार्थ्यांना गणवेशात साजरा करता येणार आहे.आज दि.१७ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषदेच्या शाळेत दुसऱ्या शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक आबासाहेब हांगे,सहशिक्षक अमर पुरी,संदिपान आगम, माधुरी कुलकर्णी, सुवर्णा अयाचित आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर उपस्थित होते.

सन २०२४ -२५ मध्ये '' एक राज्य एक गणवेश'' योजना राबविण्यात आली.पहिल्या गणवेशासाठी गणवेशाचा थेट कटींग कपडा पुरवठा करून तो बचतगटांमार्फत शिलाई करून घेण्यात आला.परंतु विद्यार्थी संख्या पाहता गणवेश शिलाईसाठी यंत्रणा अपुरी पडली त्याच बरोबर एकाच वर्गातील विद्यार्थ्यांना एकाच मापाचे गणवेश देण्यात आले होते त्यामुळे काहींना आपरे तर काहींना ढगळे होत असल्याने गणवेश मिळुनही विद्यार्थ्यांकडुन ते घालण्यात येत नव्हते.नविन वर्षांपासून शासनाने गणवेश वितरणाची जबाबदारी पुन्हा शालेय व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आल्याने येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्य मापाचे गणवेश मिळणार आहेत.त्याच बरोबर स्थानिक विक्रेते किंवा गणवेश शिलाई करून देणारे बचतगट,टेलर यांना रोजगार मिळणार आहे . त्यामुळे ऊशिरा का होईना सरकारला शहाणपण सुचले याबद्दल डॉ.गणेश ढवळे यांनी समाधान व्यक्त केले आहे. बीड जिल्ह्यातील योजनेत पात्र १ लाख ४४ हजार ३१५ विद्यार्थ्यांच्या स्काऊट गाईड व अनुरूप गणवेश शिलाईची रक्कम प्राथमिक शिक्षण परीषदेकडुन मंजूर करून प्रतिगणवेश संच शिलाई १०० रूपये व अनुषंगिक खर्च म्हणून १० रूपये असे एकूण ११० रूपये याप्रमाणे १ कोटी ५८ लाख ७४ हजार ६५० रूपयांचा निधी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांनी सीईओंच्या मान्यतेने गटशिक्षणाधिका-यांना पीएफएमएस प्रणालीद्वारे वर्ग केल्याचे सांगितले. तालुका आंबेजोगाई गणवेश व लाभार्थी ११,०४५ , वितरित निधी १२, १४,९५० तालुका आष्टी गणवेश व लाभार्थी १६,१२१ वितरित निधी १७,७३,३१० तालुका बीड गणवेश व लाभार्थी २४,५२७ वितरित निधी २६,९७,९७० तालुका धारूर गणवेश व लाभार्थी ८,७८६ वितरित निधी ९,६६,४६० गेवराई तालुका गणवेश व लाभार्थी २३,०३१ वितरित निधी २५,३३,४१० केज तालुका गणवेश व लाभार्थी १४,०८४ वितरित निधी १५,४९,२४० परळी तालुका गणवेश व लाभार्थी ९,००६ वितरित निधी ९,९०,६६० पाटोदा तालुका गणवेश व लाभार्थी ७,९०८ वितरित निधी ६,६९,८८० शिरूर तालुका गणवेश लाभार्थी ६,८५९ वितरित निधी ७,५४,४९० वडवणी तालुका गणवेश व लाभार्थी ६,८८६ वितरित निधी ७,५५,२६० ईतका निधी वितरित करण्यात आला अस आहे . स्काऊट गाइड व अनुरूप गणवेश शिलाई प्रति गणवेश ११० रूपये याप्रमाणे लाभार्थी संख्येनुसार वितरित करण्यात आले आहेत.या निधीचा विनियोग गणवेश शिलाईच्या कामासाठीच करावा.गणवेश शिलाईचे देयक प्राप्त झाल्यानंतरच निधी अदा करावा.अनियमितता होणार नाही व कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांनी सर्व गटशिक्षणाधिका-यांना दिले असल्याचे सांगितले.

सततच्या खंडित वीज पुरवठ्यामुळे शेतकरी आक्रमक

प्रजासत्ताक दिनी आत्मदहनाचा इशारा

धारूर। प्रतिनिधी

धारूर येथील चिंचपूर रोड शिवारातील शेतकऱ्यांना ४८ तासातून ८ तास वीज पुरवठा केला जात आहे यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील पीक पाण्या वाचून जोपासणे कठीण झाले आहे ही बाब महावितरण कंपनीच्या लक्षात आणून देऊनही महावितरण कंपनी शेतकऱ्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे अतोनात नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी निवेदन देऊन २६ जानेवारी रोजी आत्मदहन करण्याचा इशारा महावितरण कंपनीला दिला आहे.

धारूर येथील चिंचपुर रोड शिवारातील जवळपास २०० शेतकऱ्यांची २०० हेक्टर शेती आहे या शिवारात रब्बी हंगामातील सर्वच पिके शेतकऱ्यांनी घेतलेली आहेत मात्र या पिकांना पाण्याविना जगविने कठीण झाले आहे महावितरण कंपनीची वीज पुरवठा करण्याची व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे यामुळे शेतकऱ्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून ४८ तासातून केवळ आठ तास लाईट मिळत असल्याने शेतकऱ्यांना शेती पिकाला पाणी देण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत परिणामी शेतीतील पिके करपू लागली आहेत येथील शेतकरी पूर्णपणे शेतीवर निर्भर आहे त्यामुळे येणाऱ्या काळात वीज व्यवस्था सुरळीत नाही झाली आणि जास्त वेळ शेतकऱ्यांना वीज नाही मिळाली तर शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होऊन शेतकरी अडचणीत येऊ शकतो त्यामुळे शेतकऱ्यांनी येथील वीज पुरवठा कंपनीला तोंडी व नंतर निवेदन देऊन विजे संदर्भात कळवलेले आहे मात्र निवेदन देऊनही वीज पुरवठा कंपनीने वीज पुरवठा सुरळीत न केल्यास येथील शेतकरी २६ जानेवारी रोजी महावितरण कंपनी कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन करणार आहेत असा इशारा दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी दिला आहे गेल्या निवेदनावर पप्पू तिवारी, रोहित हजारी, श्री गोरे, अण्णा गोन्ने सह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पाणीपुरवठा योजनेचे काम ठप्प; गावकरी आक्रमक, उपोषणाचा इशारा

धारूर । प्रतिनिधी

अंजनडोह तालुका धारूर जल जीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना चे काम बंद पडले आहे या योजनेचे काम तातडीने पूर्ण करून सदरील योजना कार्यान्वित करावी या मागणीसाठी अंजनडोह ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे या तक्रारीत २६ जानेवारी च्या आत काम सुरू न झाल्यास प्रजासत्ताक दिनी आमरण उपोषणा करणार असल्याचा इशाराही दिला आहे.

अंजनडोह येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे गावातील पाणी पुरवठ्याचे स्त्रोत कोरडे पडले की गावकऱ्यांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते हा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाच्याजल जीवन योजनेअंतर्गत अंजनडो गावासाठी रेपेवाडी साठवण तलावावरून एक कोटी ४५ लाख रुपयांची योजना मंजूर झाली होती या योजनेअंतर्गत जलवाहिनीचे काम काही प्रमाणात पूर्ण झाले आहे परंतु हे काम अद्याप पूर्णत्वास केलेले नाही त्यामुळे गावकऱ्यांसमोर मोठा पाणी प्रश्न निर्माण झाला आहे सदरील योजनेअंतर्गत गावातील पाईपलाईनचे काम तसेच विहिरीचेही खोलीकरण रखडले आहे या कामाकडे संबंधित गुत्तेदार व अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याने अंजन भाऊच्या ग्रामस्थांनी आक्रमक पवित्र घेतला आहे संबंधित गुत्तेदारांच्या विरोधात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे या तक्रारीची दखल न घेतल्यास प्रजासत्ताक दिनी अमरण उपोषण करणार असल्याचा इशारा सरपंच उषा सोळुंके यांनी दिला आहे.

साडेसहा कोटीची इमारत १५ कोटीपर्यंत गेली कशी

जालना। प्रतिनिधी

जालन्यात मंत्रालय मधील मंत्री व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तथा राज्यातील मंत्री महोदय यांच्यासाठी शोभीकरण सभागृह व प्रशासकीय अधिकाऱ्यासाठी नऊ वर्षांपासून सुरू असलेले ''नियोजन भवन ''म्हणजेच जिल्हाधिकारी कार्यालयाची नूतन इमारत करण्यात आली. पण इमारत साडेसहा कोटी वरून १५ कोटी पर्यंत काम कसे झाले याची चर्चा जोरदार सुरू आहे. १५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या मध्ये प्रवेश केला.१६ रोजी मानव विकास मिशनची पहिली बैठक या इमारतीच्या सभागृहात पार पडली.

दरम्यान आत्तापर्यंत ही इमारत पूर्ण होण्यासाठी २०१६ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे यांनी मंजूर साठी प्रयत्न केले, त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. रवींद्र बिनवडे यांनी या इमारतीचा काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले . परंतु त्यानंतर आलेल्या कोविड काळामुळे या इमारतीचे काम थांबले होते. त्याला पुन्हा नव्या जोमाने सुरू करण्याची ताकद तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड मी पण प्रयत्न केले. आणि ही इमारत पूर्ण करण्याची जबाबदारी सध्या कार्यरत असल्याले जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रयत्न करून आखिर हे इमारत पूर्ण करून घेण्यात यशस्वी झाले. त्यामुळे आज या भव्य दिव्य इमारतीमध्ये स्थलांतर करण्याचा मान डॉ. पांचाळ याना मिळाला आहे. २६ जानेवारी रोजी होणारा गणराज्य दिनाचा ध्वजारोहण समारंभ देखील या नवीन इमारतीसमोर होणार आहे. परंतु हा खर्च झाला कसा तिची पण माहिती समोर येणे गरजेचे आहे. या इमारतीचा खर्च वाढत गेला याची जबाबदारी कॉन्ट्रॅक्टर, इंजिनीयर व संबंधित बांधकाम अभियंता यांची जबाबदारी आहे. मूळ खर्च जो २०१६ मध्ये साडेसहा कोटींचा होता तो इमारत पूर्णत्वास जाईपर्यंत १५ कोटी पर्यंत पोहोचला आहे.नवीन इमारतीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेल्यानंतर तुम्हाला तुमचा इतिहास आठवणार आहे. कारण जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाच्या बाहेरच भव्य अशा स्वरूपाची इतिहास लिहिलेली कोरीव अक्षरे लावण्यात आली आहेत. निजामाच्या जुलमी राजवटीमधून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली अशा स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतीला या चित्रांच्या माध्यमातून उजाळा देण्यात आला आहे. सर्व सोयींनी युक्त अशी ही इमारत आहे. या इमारतीमध्ये आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कामासाठी बाहेरगावावरून आलेल्या स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे जुन्या इमारतीमध्ये जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधी म्हणजेच पालकमंत्री किंवा इतर मंत्री आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना आपली खुर्ची सोडावी लागत होती. परंतु आता पालकमंत्री आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना आपली खुर्ची सोडण्याची गरज पडणार नाही. पालकमंत्र्यांसाठी स्वतंत्र दालन आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था येथे करण्यात आली आहे. यासंदर्भात सविस्तर माहिती समोर आली आहे.

गुरूकुलात मिळालेली साधना आयुष्यभर जपली तर समाजाला चांगले डॉक्टर मिळतील- डॉ. आदिती सारडा

बीड। प्रतिनिधी

गुरूकुलात आलेल्या विद्यार्थ्यांचा एक आगळा-वेगळा अनुभव आहे. येथे आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये खूप बदल झाला. यशस्वी होण्यासाठी गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी आपली साधना आई-वडीलांच्या चरणी अर्पण करावी तरच आपल भलं होईल. कारण वाइट मार्गाला लागण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो. मात्र आई-वडिलांच्या कष्टाची जाणिव ठेवल्यास तो एक क्षण आपण सांभाळला तर आयुष्याचे कल्याण होते. विद्यार्थ्यांना येथे मिळालेल्या साधनेचा १० दिवस उपयोग न करता भावी आयुष्यात उपयोग केला तर समाजाला अत्यंत चांगले डॉक्टर मिळतील. आणि आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार होतील असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

आदित्य आयुर्वेद महाविद्यालय द्वारा आयोजित आदित्य तीर्थात्त शास्त्रार्थ गुरुकुल ची सांगता १३ जानेवारी २०२५ रोजी दिक्षांत समारोहाने झाली. यावेळी त्या

बोलत होत्या. दिक्षांत समारोहाकरिता प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पिंगळे, आदित्य शिक्षण संस्था बीडच्या संचालिका तथा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या डॉ. आदिती सारडा व आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. शाम भुतडा यांची यांची प्रमुख उपस्थिती होती.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने आदित्य तीर्थात्त शास्त्रार्थ गुरुकुलचे आयोजन शनिवारी दिनांक ४ जानेवारी २०२५ ते १३ जानेवारी दरम्यान बीड जवळील अंतरवन पिंपरी येथील सारडा यांच्या शेतातील प्रकल्पात करण्यात आले होते. या गुरूकुलासाठी ४८ मुली तर ३५ मुले असे एकूण ८३ विद्यार्थी सहभागी झाले होते. याची सांगता दिक्षांत समारोहाने प्रमाणपत्र वितरण करुन झाली. या गुरुकुलाच्या दिक्षांत समारोहात प्रास्ताविक व अहवाल वाचन आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे उप प्राचार्य श्री. रामेश्वर ढोबळे यांनी केले. या प्रसंगी साक्षी सारडा, हर्षदा कांदे, आदित्य सरडे, यश पाटील या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन समिक्षा रोहनकर व रेय्यान तांबोळी यांनी तर आभार प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी मानले. दहा दिवस असा होता विद्यार्थ्यांचा दिनक्रम गुरूकुलमध्ये विद्यार्थ्यांचा दिवस सकाळी ४. ३० पासून सुरु होत होता. त्यानंतर व्यायाम, संहिता पाठांतर होत असे. बरोबर ९ वाजता सकाळी अध्ययन-अध्यापन सत्र सुरु होऊन सायंकाळी ५.३० पर्यंत एकूण ४ सत्र होत असत. त्या नंतर १ तास विद्यार्थी मैदानी खेळ खेळत होते. बाहेरुन आलेल्या तज्ञ अनुभवी डॉक्टरांचे रुग्णानुभव ऐकण्यासाठी दिवस भरात शिकवलेल्या विषयातील शंका समाधान करण्याकरिता १ तास अनौपचारिक चर्चा होत असत. गुरुकुलात अध्यापन करण्याकरिता पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, शेवगाव येथील प्रथित यश डॉ. श्रीरंग गलगली, डॉ. वेधस कोल्हटकर, डॉ. प्रयाग सेठीया, डॉ. आदिश काळे, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. सलोनी लोढा, डॉ. परेश देशमुख, डॉ. प्रदीप पवार, डॉ. चिन्मय फडके, डॉ. वैभव येवलेकर यांनी मार्गदर्शन केले. रात्री जेवण झाल्यावर विद्यार्थ्यातील कौशल्य विकास व्हावे याकरिता वैविध्यपूर्ण रात्री कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत होते. यात बॉनफायर, अभिराम कोर्ट, नाट्यस्पर्धा, विविध विषयांवर कार्यशाळा, प्रश्नमंजुषा, सांप्रदायिक कीर्तन तसेच प्रथित यश डॉ. सचिन रेवणवार, आयुर्वेदातील वैज्ञानिक दिनानाथ मंगेशकर रुग्णालय पुणे येथील कॅन्सर तज्ञ डॉ. पंकज वांजरखेडकर, डॉ. गणेश मलवाडे यांची मुलाखत घेण्यात आली.

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती डी के पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज २७/२०२५ ॲड. उबाळे एम. आर.

अलका व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १) अलका भ्र.अजिनाथ दिवे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेर धानोरा ता.जि. बीड., २) आरती पि. अजिनाथ दिवे, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर, ३) ओकांर पि. अजिनाथ दिवे, वय २४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, ४) इंदुबाई भ्र.पारसनाथ दिवे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे अजिनाथ पि. पारसनाथ दिवे यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे अजिनाथ पि. पारसनाथ दिवे रा. आहेर धानोरा ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक ११/०२/२०२३ रोजी आहेर धानोरा ता. जि. बीड येथे झाला, अर्जदार क्र. ०१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क्र. ३ मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. क्र. मयताची आई आहे. मयतास सदर अर्जदारां शिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार व गैरअर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अजिनाथ पि. पारसनाथ दिवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक १७/०१/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १३/०२/२०२५

आदेशावरुन
स्वाक्षरित
स्वाक्षरित
क. लिपीक
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

जाहीरनामा

धारुर येथील श्रीमती ए.बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३३५/२०२४

माणिक वि. राम व इतर १

अर्जदार यांनी मयत पांडूरंग पिता बापुराव लाखे मौजे खोडस ता. धारुर जि. बीड हे दिनांक २८/०५/२०२४ रोजी मौजे खोडस ता. धारुर जि. बीड येथे मयत झाल्याचे नमूद केले आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार माणिक पिता पांडूरंग लाखे, वय ५३ वर्षे, धंदा शेती रा. खोडस ता. धारुर जि. बीड ह.मु. छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर, गैरअर्जदार क्र. १ राम पिता पांडूरंग लाखे, वय ४० वर्षे, धंदा शेती रा. खोडस ता. धारुर जि. बीड , गैरअर्जदार क्र. २ चंचलाबाई भ्र. पांडूरंग लाखे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. खोडस ता. धारुर जि. बीड यांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे मयताची मुले आणि गैरअर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार आणि गैरअर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. २ हे मयत माणिक पिता पांडूरंग लाखे, यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत माणिक पिता पांडूरंग लाखे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :१८/११/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : ११/०२/२०२५

स्वाक्षरित
स्वाक्षरित
सी.के.पवार
क. लिपिक
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, धारुर

फुलसांगवीत महंत रामेश्वर शास्त्रीच्या भागवत कथेने भक्तिमय वातावरण

फुलसांगवी। प्रतिनिधी

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे भव्य स्वरूपात अखंड हरीनाम सप्ताह व श्रीमद्? भागवत कथा सोहळा मोठ्या उत्साही वातावरणामध्ये सुरू असून, महंत रामेश्वर महाराज शास्त्री यांच्या संगीत भागवत कथेने फुलसांगवी परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

'वैराग्याचे महामेरू 'श्री. संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी (भाऊंच्या जन्मभूमी) महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या तीन दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरीनाम सप्ताह मोठ्या थाटात पार पडत असून या सप्ताहात श्री क्षेत्र ब्रम्हनाथ संस्थान मठाधिपती महंत रामेश्वर महाराज शास्त्री यांच्या भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. रामेश्वर शास्त्रीच्या रसाळ वाणीतून वदवली जाणारी भागवत कथा उपस्थित भाविक भक्तांच्या मनाला भावून जात आहे. भागवत कथेतून मिळणाऱ्या अध्यात्मिक ज्ञानमृताला गायन वाद्य संगीताची साथ संगत मिळत असल्याने या कार्यक्रमाला मोठी रंगत चढली आहे.संगीत विशारद हभप.गणेश महाराज जरांगे,आदिनाथ महाराज दराडे, नशिकेत महाराज यांच्या गायनाला सिंथवादक बापू महाराज यांच्या सुमधुर ध्वनी लहरीला तबला वादक विकास महाराज जायभाये, महादेव महाराज इंगळे,नारायण महाराज काकडे यांच्या तबला वादणाने कन्हैया महाराज यांच्या बँजो वादनाणे व सुरंजन महाराज जायभाये व दत्ता महाराज भालेकर यांच्या सह गायनाने या भागवत कथेला मोठा संगीतमय बहर आला आहे.या भाविक भक्त तल्लीन होऊन ज्ञानमृताचा आंनद लुटत आहेत.यामुळे सप्ताहच्या मंडपामध्ये भक्तिमय वातावरणात निर्माण झाले आहे.

भाविकांचा ओघ वाढला..

गेल्या तीन दिवसापासून चालू असलेल्या भागवत कथा दिवसेंदिवस चढत असल्यामुळे या कथेसाठी भाविक भक्तांचा मोठा ओघ वाढू लागलाय सप्ताहाच्या तिसऱ्याच्या दिवशी मंडप भाविक भक्ताची मोठी गर्दी करून भागवत कथेचे श्रवण केले आहे.

दुःखामध्ये देवच आपल्या सोबत-रामेश्वर शास्त्री

मनुष्य सुखी असला म्हणजे त्याला सर्व जण आपलंस करतात व त्याच्या सुखाचा आनंद लुटतात मात्र तोच माणूस दुःखात असला तर त्याला कोणीच सोबत देत नाहीत. किंबहुना दुःखात कोणीच आपल्या सोबत नसतात अशा वेळी फक्त देवचं आपल्या सोबत असतो. तोच आपले दुःख निवारत असतो. म्हणून देवाला आपलंस करा असे प्रतिपादन भागवत कथेतून रामेश्वर महाराज शास्त्री यांनी भाविक भक्तांना केले आहे.

रस्ता रूंदीकरणात पाडली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दवाखाना या राज्य मार्गावरील अतिक्रमणे ?

विकासाच्या नावाखाली गोरगरिबांचे संसार उद्ध्वस्त केले –ॲड.इस्माईल गवळी व कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांची पत्रकार परिषद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रस्त्याच्या रूंदीकरणासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती दवाखाना या रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम नुकतीच राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत मागील अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दोन्ही बाजूला राहत असलेल्या २०० हून अधिक नागरिकांची घरे, दुकाने जमीनदोस्त करण्यात आली. त्यामुळे या भागातील नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी आणि तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रश्नी गोरगरीब नागरिकांचा आवाज सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी अंबाजोगाईतील सदर बाजार चौक येथे गुरूवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी जमीन अधिगृहणाबाबत लेखी सूचना नाही, मालमत्तांबाबत काय निर्णय घेतला असा सवाल करून विकासाच्या नांवाखाली गोरगरिबांचे संसार उद्धवस्त केले हे योग्य नाही. याचा आम्ही निषेध व्यक्त करतो. याप्रकरणी आम्ही न्यायालयात जाऊन दाद मागणार आहोत, लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत असे ऍड.इस्माईल गवळी व कॉ.बब्रुवाहन पोटभरे पत्रकार परिषदेत म्हणाले.

अंबाजोगाई शहरात रस्त्याच्या रूंदीकरणाच्या नांवाखाली गुत्तेदार लोकांची घरे भरण्याचे काम चालू आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही. पण, रस्ता किती फुटांचा होणार ? अतिक्रमणाच्या नांवाखाली गोरगरीब लोकांचे संसार उद्धवस्त केले. त्यामुळे आता या अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन होणार की, नाही ? छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती दवाखाना हा रस्ता राज्य मार्ग कधी झाला व त्याची प्रक्रिया काय आहे ?, दोन वर्षांपूर्वी या रस्त्यावर दोन्ही बाजूंचे नाली बांधकाम ८० फुटांचे का केले. मग रस्त्याच्या मध्यभागी (सेंटर) पासून किती अंतर मोजले..?, नागरिकांच्या अतिक्रमणांचे पंचनामे केले नाही, तसेच ज्यांची घरे मालकीची आहेत त्यांना जमीन अधिगृहणाबाबत लेखी सूचना का दिल्या नाहीत, मालमत्तांबाबत काय निर्णय घेतला..?, अंबाजोगाई शहरातून १०० फुटांचा रस्ता करण्याची काय आवश्यकता, गरज होती..?, हि तत्परता येल्डा रोडबाबत का दाखवली नाही..? मागील पाच वर्षांपासून

हा रस्ता रखडला आहे, या नादुरूस्त रस्त्यामुळे १७ लोकांचा जीव गेला आहे. अंबाजोगाई तहसील कार्यालयाच्या समोरील दुकाने हटवली. त्यांना त्या जागेवर दुकान का दिले नाही. मंडी बाजार भागातील रस्त्यांच्या कडेला कसे दिले. एकाच शहरात दोन भूमिका वेगवेगळा न्याय कशासाठी..? अनेक वर्षांपासून शहरातील विविध शासकीय कार्यालयात ३ वर्षांपासून अधिक काळ अधिकारी, कर्मचारी म्हणून ठाण मांडून बसलेले आहेत. या अधिकारी, कर्मचाऱ्यांना बदलीचा कायदा लागू नाही का..?, वाढत्या घरफोडी, चोऱ्या, वाहन चोरी, मारहाण, खून या सारख्या घटनांमुळे जनता भयभीत आहे. तरी अंबाजोगाई शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत. अशी नागरिकांची अपेक्षा आहे. स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय ग्रामीण रूग्णालयातील बनावट औषध खरेदी घोटाळा प्रकरणी सखोल न्यायालयीन चौकशी करून संबंधित दोषी कंपन्या, कंत्राटदार, जबाबदार अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशा मुद्द्यांवर सदरील पत्रकार परिषदेत चर्चा करण्यात आली. तसेच पुनर्वसनाबाबत कुठलीही माहिती न देता सार्वजनिक बांधकाम विभागाने नागरिकांच्या पीटीआर, खरेदीखत, सातबारा या मालकी पुराव्यांची पाहणी न करता जी अतिक्रमणाच्या नांवाखाली बांधकामे पाडली आहेत. दिलेल्या नोटीसीत अर्थबोध होत नाही. याचा आम्ही निषेध व्यक्त करीत आहोत, आमचे अतिक्रमणाला समर्थन नाही तर अतिक्रमणाच्या नोंदी घेवून दंडात्मक कार्यवाही करण्यास ही आमचा विरोध नाही. असे ही पत्रकार परिषदेत ॲड.इस्माईल गवळी यांनी सांगितले. तर कॉ.बब्रुवाहन पोटभरे म्हणाले की, संपूर्ण देशात कार्पोरेट, सनातनी सत्ता आदिवासी, अल्पसंख्यांक, दलित, कष्टकरी, शेतकरी, कामगार यांच्या विरोधात काम करीत आहे. कुणाचे घर मोडून विकास नको आहे. जाणीवपूर्वक जनतेला वेठीस धरू नका. जनतेवर सुड उगवू नका. गलिच्छ वस्त्यांचे पुनर्वसन करा, अंबाजोगाई शहरात मुख्य रस्त्याचे रूंदीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यास सुरूवात केली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते 'स्वाराती' रूग्णालय रस्त्यावर अनेक जणांचे शेकडो वर्षांपासूनची खाजगी मालकीची घरे असून तेही पाडण्यात आली आहेत. परंतू, सार्वजनिक बांधकाम विभाग याबाबत कुठल्याही पध्दतीची माहिती न देता अतिक्रमणे काढत आहेत. खाजगी मालकीच्या लोकांना मोबदला मिळणार का ? त्यांचे पुनर्वसन होणार का ? सगळे प्रश्न अनुत्तरित असताना पोलिस बळाचा वापर करून अतिक्रमणे काढण्याची घाई कशाला ? पोलिसांनी सामान्य लोकांना भिती दाखवू नये, या प्रकरणी जनतेला विश्वासात घेऊन आंदोलन करण्यात येईल असा इशारा नागरिकांच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला. या पत्रकार परिषदेला जहिरभाई, अन्वरभाई तसेच अतिक्रमण कारवाईत विस्थापित झालेल्या नागरिकांची उपस्थिती होती. दरम्यान, अंबाजोगाई तालुका प्रशासनाचा निषेध नोंदविण्यासाठी लवकरच विस्थापित झालेल्या नागरिक आंदोलन करतील. अशी माहिती कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.

तरुणांनो शिक्षणाबरोबरच मैदानी खेळालाही महत्त्व द्या -पत्रकार अविनाश कदम

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आष्टी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाला महत्त्व दिल्यास सुदृढ समाजाची निर्मिती होऊ शकेल तर क्रीडा स्पर्धेतुन देखील विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य घडवण्याची संधी आहे.विद्यार्थी व तरुण बांधवांनो आयुष्यात सूटबूट कधीही मिळतील, पण निरोगी शरीर मिळत नाही. याची जाणीव नव्या पिढीने ठेवावी.मोबाईलचा अतिरेक टाळावा आणि कोणत्याही खेळात सहभाग घ्यावा असा आशावाद व्यक्त करुन मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी दिला ते शासकीय

औद्योगिक प्रशिक्षण संस्था आष्टी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांच्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य गणेश हडतगुणे यांनी केले.

पुढे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करताना पत्रकार अविनाश कदम म्हणाले की मुलांना ज्या क्रीडाप्रकारात रस आहे त्या क्रीडाप्रकाराकरिता पालकांनी त्यांना प्रोत्साहन दिले तर निश्चितच यश मिळते. आयुष्यात सूटबूट कधीही मिळतील, पण निरोगी शरीर मिळत नाही. याची जाणीव नव्या पिढीने ठेवावी मोबाईलचा अतिरेक टाळावा.'' शिक्षण घेत असताना मैदानी खेळ देखील खेळले पाहिजे आपल्या ग्रामीण भागातील मांडवा येथील विट्ट भट्टी कामगाराचा मुलगा अविनाश साबळे देशात आपल्या गावाची तालुक्याची,आई वडीलांची मान उंचावली आहे.आजच्या काळामध्ये मैदानी खेळ अतिशय महत्त्वाचे आहे. अशा प्रकारच्या स्पर्धेमधून अनेक प्रकारचे जागतिक दर्जाचे खेळाडू निर्माण होतात विद्यार्थ्यांमध्ये खेळाडू वृत्ती निर्माण होते तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन जिल्हास्तरावर प्रवेश मिळवावा असे आवाहन त्यांनी केले यावेळी खो-खो, हॉलीबॉल क्रिकेट, बुद्धिबळ १०० /२०० मीटर धावणे, कॅरम इत्यादी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदवला या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कर्मचारी सौ. नागरगोजे एस के, दहिफळे डी.व्ही,आरोळे, ए.आर,सानप आर. एस, घुले एम. ई,एम जी पवार,अर्षद शेख, साईनाथ देवकर, रमेश डिडूळ, नेताजी साळवे,झाडे सुभाष आदींनी परिश्रम घेतले.

मोठेवाडीत रंगला कुस्तीचा फड

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील औरंगशाह बाबा पीर यांच्या उरूस यात्रा उत्सवा निमित्त शुक्रवारी कुस्तीचा फड रंगला. या कुस्ती फडाचे उदघाटन गावचे फौजी राम तपसे यांच्या हस्ते करण्यात आले. मोठेवाडी जवळील शेत मैदानावर कुस्त्यांची दंगल पार पडली.

यावेळी अनेक कुस्तीपटूंनी यात सहभाग घेऊन कुस्तीच्या फडाची रंगत वाढविली. शेवटची कुस्ती ५ हजार ५०५ रूपायाची झाली. परिसरातील हजारो नागरिक कुस्त्यांचा हा मुकाबला पाहण्यासाठी जमले होते. ही कुस्त्यांची दंगल पार पाडण्यासाठी मोठेवाडी येथील उरूस यात्रा कमिटी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले तर यावेळी ग्रामिण पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला ; हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात पोलिसांना यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिवसभराचे कामकाज आटोपून घराकडे निघालेल्या सुजित श्रीकृष्ण सोनी या तरुण व्यापाऱ्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करून सोन्याची अंगठी आणि मोबाईल लंपास केल्याची घटना बुधवारी रात्री अंबाजोगाई शहरात घडली होती. या हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. ही सर्व आरोपी अल्पवयीन आहेत.

सुजित सोनी यांची नगर परिषद परिसरात कोलगेट सह अन्य कंपन्यांची एजन्सी आहे. बुधवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास कामकाज आटोपून घराकडे जात असताना यशवंतराव चव्हाण चौकातील नगर परिषद व्यापारी संकुलात असलेल्या हॉटेल कोकीताच्या मागील बाजूस तीन दुचाकीहून आलेल्या तीन हल्लेखोरांनी

अंबाजोगाईतील घटना, सर्व आरोपी अल्पवयीन

त्यांच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. त्यानंतर हल्लेखोरांनी सुजित यांची दोन तोळ्याची सोन्याची अंगठी आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला आन पळून गेले. त्यानंतर गंभीर जखमी झालेल्या सुजित यांनी स्वतःच्या दुचाकीवरून खाजगी रुग्णालय गाठले. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आणि वाय्पारी वर्गात भीतीचे वातावरणा पसरले. आधीच संवेदनशील झालेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा हल्ल्याची घटना घडल्याने पोलिसांनी हे प्रकरण अतिशय गांभीर्याने घेतले.

नोकरानेच दिली टीप

या प्रकरणी शहर पोलिसात कलम ३११, ३ (५) नुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने वेगाने तपासाला सुरुवात केली. अवघ्या २४ तासात पोलिसांनी या गुन्ह्याचा उलगडा करत चार अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. यापैकी एक आरोपी सोनी यांच्याकडेच कामाला होता. त्यानेच सुजित यांच्याबाबत टीप साथीदारांना दिली अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. ही कारवाई बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवीन नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक पांडकर, चेतना तिडके पोलिस निरक्षक उस्मान शेख यांच्या विशेष मार्गदर्शना खाली पोलीस निरिक्षक विनोद घोळवे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुतळे, पोहेकॉ मारूती कांबळे, सचिन सानप, राजु पठाण, नितीन वडमारे, शहर पोलीस स्टेशनचे स पो उ नी कांबळे, स पो नी निंलगेकर, पो हे को आवले, कॉ नागरगोजे, चादर, काळे यांनी केली.

आ.संदीप क्षीरसागरांची नवीन संकल्पना

प्रशासन आता मतदारसंघातील गावोगावी जाणार

शासकीय योजनांची माहिती गावकऱ्यांना देण्यासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात कॅम्प

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना शासनस्तरावरील योजनांची माहिती देण्यासाठी गावोगावी जाऊन प्रशासनाने शिबीर घ्यावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांची माहिती द्यावी अशी नवीन संकल्पना आ.संदीप क्षीरसागर यांनी सुचवून याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रशासनाकडून शिबीर घेण्यात येणार आहेत.

शासनाच्या योजना विविध योजना शेतकरी, दुर्बल घटक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी अधिक प्रभावी मार्गाचा अवलंब केला जावा. या हेतूने आ.संदीप क्षीरसागर यांनी नवीन संकल्पना सूचविली. महसूल विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग यांसह इतर विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावोगावी जाऊन संयुक्तरित्या शिबीर घ्यावेत. या शिबीरांमध्ये प्रत्येक घटकातील लोकांसाठी असलेल्या योजनांची त्या-त्या लोकांना देऊन त्यांना असलेल्या शंका आणि समस्यांचे निराकरण ◀◀ पान ३ वर

जीवनात आनंदी राहण्यासाठी देवाचे नामस्मरण करा -निवृत्ती महाराज इंदोरीकर

गेवराईत संत भाऊ-बाबा प्रतिष्ठानचा भव्य कीर्तन महोत्सव सुरु

गेवराई । प्रतिनिधी

जगात फक्त दोन गोष्टी बलवान आहेत. एक काळ आणि दुसरी ज्ञान म्हणून या जगात काळ कुणालाच घाबरत नाही तो फक्त संतांना घाबरतो कारण तिथे ज्ञान आहे. आपल्याकडे पद, पैसा, सत्ता, संपत्ती किती असू द्या ते कामी येत नाही म्हणून आनंदी जीवन जगायचे असेल तर ज्ञानी बना आणि देवाचे नामस्मरण करा असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी व्यक्त केले. ◀◀ पान ३ वर

संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या धार्मिक कार्याचे ह.भ.प.इंदोरीकर महाराजांकडून कौतुक

गेवराई येथे संत भाऊ-बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने हा भव्य सोहळा गेल्या २० वर्षांपासून होतो आहे. हेच भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचे खरे काम आहे. देव मिळवायचा असेल तर संताशिवाय पर्याय नाही. समाजाच्या हितासाठी सतत भजन, कीर्तन करुन ब्रम्हरुप होवून देव झाले त्यांना संत भाऊ-बाबा असे म्हणतात त्यांचे वैराग्याने शरिर पुर्ण झाले म्हणून हा संत भाऊ-बाबांच्या पुण्यतिथीचा हा भव्य सोहळा गेल्या २० वर्षांपासून येथे होतो आहे. संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे कौतुक करुन प्रत्येकाने देवाचे भजन करुन पुण्य कमवा असा मौलिक सल्लाही शेवटी ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी दिला.

मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री पदच रद्द करावे -प्रा.सुरेश नवले

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात सध्या पालकमंत्री पद हे कळीचे पद होऊन बसले आहे. कधी काळी महाराष्ट्रात पालकमंत्रीपद नव्हते, खरं तर पालकमंत्री पदाची गरजच नाही, जिल्ह्याचे पालकमंत्री जिल्ह्याचे ''मुख्यमंत्री'' समजून काम करतात. अधिकार एकवटल्यामुळे सत्तेचे केंद्रिकरण झाले आणि त्यामधून गैरप्रकार वाढीस लागले. अवैध मार्गाने वसूलीचे उद्योग सुरू झाले, टक्केवारी बोकाळली, विविध

विभागांना निधी देण्याच्या मोबदल्यात टक्केवारी वसुल केल्या जाऊ लागली, हे एखादा दुसरा जिल्हा अपवाद वगळता महाराष्ट्रात सर्रास घडत आहे. उघड्या डोळ्यांनी पाहण्यापलीकडे मा.मुख्यमंत्री काहीच करू शकत नाहीत, कारण त्यांचे ते मंत्रिमंडळातील सहकारी आहेत. पालकमंत्री पद नसल्यामुळे विकासाला खिळ बसते वगैरे हे धांदात असत्य आहे. पालकमंत्री हे जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांना समान न्याय देत नाहीत. निधी वितरणामध्ये भेदभाव केला जातो. म्हणून समतोल विकासाला खीळ बसते. लोकनियुक्त लोकप्रतिनिधींना बाजूला ठेवून निधी वितरीत केला जातो, हेच मुळात लोकशाहीला मारक आहे. राज्यस्तरीय विभाग निहाय मंत्री समिती किंवा मंत्रीगट स्थापन करून जिल्ह्या जिल्ह्याचे नियोजन त्या त्या समिती किंवा मंत्रीगटावर टाकले तर ही एकाधिकारशाही आणि अनागोंदी कमी होऊ शकेल. मंत्रीगटामध्ये किंवा मंत्री समितीमध्ये किती मंत्री असावेत हे मा. मुख्यमंत्री यांचा अधिकार आहे. असे केले तर नक्कीच जे जागोजागी टक्केवारीचे ठेले उभे केलेले आहेत ते बंद होतील आणि जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल असे प्रा.सुरेश नवले यांनी म्हटले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

वाल्मीक कराडचा बारामतीतील हार्वेस्टर मालकांनाही गंडा; शेतकरी सुळेंच्या भेटीला

बारामती । प्रतिनिधी

सध्या राज्यभर गाजत असलेल्या तसेच सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात मोक्का लागलेल्या परळीतील वाल्मीक कराड याने ऊसतोडणी यंत्र (हार्वेस्टर) अनुदानाच्या आमिषाने फसविलेल्या बारामतीतील शेतकर्यांनी गुरुवारी खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन त्यांना आपली कर्मकहाणी सांगितली.

हार्वेस्टर घेतलेल्या शेतकर्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी प्रत्येकी आठ-आठ लाख रुपये घेतले. अनुदानही दिले नाही आणि पैसेही परत केले नाहीत, अशी तक्रार फसवणूक झालेल्या शेतकर्यांनी खा. सुळे यांच्याकडे केली. खा. सुळे यांनी जिल्हा पोलीस

अधीक्षक पंकज देशमुख यांना फोन करत या प्रकरणाची चौकशी करत शेतकर्यांना न्याय द्या, अशी मागणी केली. केंद्र सरकारच्या वतीने ऊसतोडणी मशिनसाठी देण्यात येणारे ४० टक्के अनुदान मिळवून देतो, असे सांगत वाल्मीक कराडने ही फसवणूक केली असल्याचे या शेतकर्यांचे म्हणणे आहे. बारामती तालुक्यातील तरडोली येथील शेतकरी व हार्वेस्टर मालक रामचंद्र विठ्ठल भोसले यांनी या फसवणूक प्रकरणाची माहिती खा. सुळे यांच्यासमोर माध्यमांना दिली. भोसले यांच्या म्हणण्यानुसार, मुंडे यांचे कराड हे निकटवर्तीय असून, ते तुम्हाला प्रत्येकी ३६ लाख रुपये अनुदान मिळवून देतील, त्यासाठी प्रत्येकी आठ लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगण्यात आले होते.

पैसे दिल्यानंतर कराडकडे शेतकरी अनुदान कधी मिळणार याची चौकशी करत होते. प्रत्येक वेळी पुढच्या महिन्यात होईल, अशी आश्वासने दिली जात होती. दरम्यान, लोकसभा निवडणूक काळात या शेतकर्यांनी बीडमध्ये धनंजय मुंडे यांची भेट घेतली. या वेळी मुंडे हे हॉटेलात चौथ्या मजल्यावर तर शेतकरी पहिल्या मजल्यावर होते. त्या वेळी कराड दोन पोलीस संरक्षकासह पाच-सहा गुंडांना घेऊन आला. शेतकर्यांना मारहाणीची घटना तेथे घडली.

एसपींकडून चौकशी होईल : खा. सुळे

बारामती लोकसभा मतदारसंघातील हार्वेस्टर मालक शेतकर्यांची फसवणूक झाल्याच्या बातम्या आल्या होत्या. त्या अनुषंगाने गुरुवारी बारामतीत शेतकर्यांनी भेट घेतली. या शेतकर्यांकडून हार्वेस्टर अनुदानासाठी मध्यस्थांनी आठ लाख रुपये घेतले आहेत. शेतकर्यांशी सविस्तर चर्चा झाली. जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांना मी फोन केला.

दुधाचे अनुदान साडेतीन महिन्यांपासून रखडले; जिल्हा दूध विकास विभागाने ऑक्टोबरपासून प्रस्तावच घेतले नाहीत

निरगुडसर - सरकारने जाहीर केलेल्या जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांत आलेल्या प्रस्तावांचे १७९ कोटी दिले; परंतु त्यानंतर दुधाला जाहीर केलेले प्रतिलिटर सात रुपये अनुदान १ ऑक्टोबर ते १५ जानेवारी या साडेतीन महिन्यांपासून रखडले आहे.

सरकारकडून अनुदान प्राप्त न झाल्याने ऑक्टोबरपासून जिल्हा दूध विकास विभागाने दूध अनुदानाचे प्रस्तावच घेतले नसल्याने दूध अनुदान मिळणार, की नाही, असा प्रश्न उपस्थित राहत आहे. अशामध्ये जनावरांना आहारात रोज लागणारा भुसा ५० किलो बॅगमागे २०० रुपयांनी महागल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शासनाच्या १२ जुलै २०२४च्या निर्णयानुसार दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये

अनुदान योजना जाहीर करण्यात आली होती. ही योजना १ जुलै २०२४पासून सुरू झाली असून, या योजनेत पुणे जिल्ह्यातील ११८ सहकारी व खासगी दूध प्रकल्पांनी सहभाग नोंदवला आहे. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२४ या तीन महिन्यांसाठी सरकारने प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याची घोषणा केली होती. त्यावेळी दुधाला फॅट ३.५ आणि ८.५ एसएनएफसाठी ३० रुपये दर होता. या तीन महिन्यांचे १७९ कोटी रुपयांचे अनुदान सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिले आहे. त्यामध्येही अनेक दूध उत्पादक शेतकरी वंचित आहेत. त्यानंतर १ ऑक्टोबर २०२४ पासून प्रतिलिटर दोन रुपये वाढ करून सात रुपये अनुदान देण्याचे जाहीर करण्यात आले. फॅट ३.५ आणि ८.५ एसएनएफसाठी २८ रुपये दूध दर करण्यात आला होता. मात्र, हे अनुदान शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही.

रोटरी क्लब पुणे मिडटाउन तर्फे 'योगा' स्पर्धांचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

रोटरी क्लब पुणे मिडटाउन तर्फे रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी योगा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मुलांमुलींमध्ये योग-व्यायाम याविषयी आवड निर्माण व्हावी व त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने हि स्पर्धा भरवण्यात येते.

यंदा या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. सेवासदन शाळा, एरंडवणे, पुणे येथे स.९ ते २.३० या वेळेत चार गटांमध्ये हि स्पर्धा घेण्यात आली. या योगा स्पर्धेत विविध शाळातील अनेक विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. प्रमुख पाहुणे योगगुरु अविनाश धस यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रत्येक गटाचे वेळ संपल्यानंतर लगेच त्या गटाचा बक्षीस समारंभ करण्यात

आला. गट १ (१ ली ते ४ थी) प्रथम क्रमांक लयेशा कार्तिकेय (ट्रि हाऊस स्कुल), द्वितीय क्रमांक प्रणया निलेश पोडके (दिल्ली पब्लिक स्कुल), तृतीय क्रमांक - यशदा शिंदे (फॉरचून स्कुल) उत्तेजनार्थ १- आरोही कारंडे (परांजपे स्कुल), उत्तेजनार्थ २- अन्वेश मांडलिक (डॉ. कलमाडी स्कुल) गट २ (५ ते ७ वी)- प्रथम क्रमांक आदित्य तोरस्कर (परांजपे स्कुल), द्वितीय क्रमांक - शिवराज काळे (परांजपे स्कुल), तृतीय क्रमांक अन्वी सोनवणे (भारतीय विद्यापीठ स्कुल), उत्तेजनार्थ १- माहेश्वरी चौधरी (परांजपे स्कुल), उत्तेजनार्थ २- मीरा काळे (न्यू इंडिया स्कुल) गट ३ (८ वी ते १२ वी) प्रथम क्रमांक मीत छाजेड (युरो स्कुल), द्वितीय क्रमांक - स्वरा काटे (सेंट मीराज् स्कुल), तृतीय क्रमांक विनायक पाटील (विद्या विकास स्कुल), उत्तेजनार्थ १- अनन्या गोवंडे (अहिल्यादेवी स्कुल), उत्तेजनार्थ २- श्रावणी हंजगोळ (अहिल्यादेवी स्कुल) गट ४ (ओपन) - प्रथम क्रमांक- शीतल पटेल, द्वितीय क्रमांक- पूनम मठपती, तृतीय क्रमांक- प्राजक्ता कानडे असे प्रत्येक गटासाठी बक्षिसे देण्यात आली. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यास पार्टिसिपेशन सर्टिफिकेट व खाऊ देण्यात आला. सदर बक्षीस समारंभ प्रमुख पाहुणे अविनाश धस, झऊऋ डॉ. सुधीर राशिनकर, प्रेसिडेंट अभिजीत म्हसकर व तझ डॉ. शुभदाताई जठार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मुलांना पाठिंबा देत असल्याबद्दल पालकांचेही कौतुक केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

स्वारगेट परिसरात बांगलादेशी नागरिकाची घुसखोरी

१० वर्षांपासून वास्तव्यास, पोलिसांनी सापळा रचून केली अटक

पुणे । प्रतिनिधी

शहरातील स्वारगेट परिसरातील महर्षीनगर भागात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला स्वारगेट पोलिसांनी सापळा रचून पकडले. स्वारगेट पोलिसांच्या पथकाला याबाबत माहिती मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने महर्षीनगर भागात सापळा सचला आणि एका बंगलादेशी व्यक्तीला पकडले. याबाबत पोलीस हवालदार सोमनाथ ढगे यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी पकडलेल्या बांगलादेशी व्यक्तीचे नाव एहसान हाफिज शेख (वय ३४ सधा राहणार महर्षीनगर, गुलटेकडी, मूळ राहणार बांगलादेशी) याला अटक करण्यात आली असून त्याच्या विरुद्ध परकीय कलम १४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून पोलिसांनी बनावट आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड कारवाईत जप्त केले आहे. पोलिसांकडून या व्यक्तीने ही बनावटे कागदपत्रे कशी मिळवली याचा तपास करण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१४ मध्ये त्याने भारतात घुसखोरी केली होती. त्यांतर तो पुण्यात वास्तव्याला आहे. त्याने कपडे विक्रीचा व्यवसाय सुरू केला होता. स्वारगेट पोलिसांच्या पथकाला याबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी स्वारगेट परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक पाटील हे करत आहेत.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाची मागणी

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेटजवळील मित्रमंडळ चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक करण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख प्रमोद भानगिरे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली. त्याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना दिले.

मित्रमंडळ चौकातील पृथ्वीचे शिल्प जुने झाले असून, त्याची देखभाल दुरुस्ती व्यवस्थित केली जात नाही. त्यामुळे तेथे छत्रपती संभाजी महाराज यांचे ३० फुटांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, ही शिवसैनिकांची मागणी आहे. त्यादृष्टीने शिवसैनिकांच्या मागणीची दखल घेऊन, भानगिरे यांनी संबंधित मागणीचे निवेदन आयुक्तांकडे दिले. या वेळी शिवसेना पर्वती विधानसभा मतदारसंघाचे विभागप्रमुख महेंद्र जोशी उपस्थित होते. स्मारकाबाबत आयुक्त डॉ. भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती भानगिरे यांनी दिली.

हॉटेलमालकासह सहकाऱ्यांना कोयत्याने मारहाण

सासवड । प्रतिनिधी

पेव्हिंग ब्लॉक बसविण्याचे काम सुरू असताना दुचाकी बाजूला लावण्यास सांगितल्याने हॉटेलमालकासह सहकार्यास सात जणांच्या टोळक्याने लाकडी दांडके, कोयत्याने जबर मारहाण केली. ही घटना भिवरी (ता. पुरंदर) येथे शनिवारी (दि. ११) सायंकाळी ६ वाजता घडली. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आरोपींवर तातडीने कारवाई करण्यासाठी भिवडी ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. १४) उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांना निवेदन दिले आहे. हॉटेलचे मालक कैलास निवृत्ती वांढेकर, सहकारी अनिकेत रामदास कटके (दोघे रा. भिवडी, ता. पुरंदर) अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. दत्ता शेलार, गणेश पवार याच्यासह त्यांच्या पाच साथीदारांवर (नावे समजू शकली नाहीत) गुन्हा दाखल केला आहे. याबाबतची फिर्याद कटके यांनी दिली आहे. भिवरी येथे कैलास वांढेकर यांचे निसर्ग हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविण्याचे काम सुरू आहे. या वेळी आरोपी दुचाकी उभी करू लागले असता, त्यांना कामगारांनी दुचाकी बाजूला लावण्यास सांगितले. त्याचा राग आल्याने एका कामगाराच्या कानाखाली मारत 'तुला माहिती नाही, आम्ही कोण आहोत,' अशी दमदाटी केली आणि ते निघून गेले. त्यानंतर अर्ध्या तासाने दुचाकीवरून लाकडी दांडके आणि कोयते घेऊन आरोपी आले. त्यांनी कामगारांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी अनिकेत कटके भांडण सोडवण्यासाठी आले असता, दत्ता शेलारने लाकडी दांडक्याने डाव्या हातावर आणि डोक्यात जोरदार मारहाण केली. त्यावेळी जखमी झाल्याने ते जोरात ओरडले. त्यांचा आवाज ऐकून कैलास वांढेकर बाहेर आले असता, गणेश पवारने त्यांना कोयत्याने मारहाण केली. या घटनेचा निषेध नोंदवीत भिवडी गावातील ४०० ते ५०० नागरिकांनी सासवड येथे तहसील कार्यालयापासून मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरून सासवड पोलीस ठाण्यापर्यंत मूक मोर्चा काढला. त्यानंतर आरोपींवर कारवाई करण्याबाबतचे पोलिसांना निवेदन दिले. तसेच, मंगळवारी उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांनाही निवेदन देण्यात आले.

या वेळी निरा बाजार समितीचे माजी सभापती विठ्ठल मोकाशी, बाळासाहेब भिंताडे, शहाजी गायकवाड, उमेश गायकवाड, राहुल मोकाशी, डॉ. मनोज शिंदे, साधू दिघे, नानासाहेब वांढेकर, राहुल गायकवाड, मंगेश भिंताडे, दिलीप भिंताडे, कांताभाऊ खोमणे, पांडुरंग भिंताडे, संजय दिघे, बाळासाहेब क्षीरसागर, दादासाहेब दिघे, सागर मोकाशी आदी उपस्थित होते.

तीन अपत्यांमुळे गमावले ग्रामपंचायत सदस्याचे पद

नसरापूर ता. १७ : कांबेर खे.बा. (ता. भोर) ग्रामपंचायतीचे सदस्य श्रीरंग पर्वती कोंढाळकर यांना तीन अपत्यांमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरवले.

कांबरे ग्रामपंचायतीचे सदस्य श्रीरंग कोंढाळकर यांनी ग्रामपंचायत सदस्यपदाची निवडणूक लढविताना त्यांना सन २००१ नंतर तीन अपत्य असताना एक अपत्य लपवून ग्रामपंचायत निवडणुकीसाठी दोनच अपत्य असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. याबाबत ग्रामस्थ सुनील सुरेश सुतार यांनी जून २०२३ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यात श्रीरंग कोंढाळकर यांना सन २००१ नंतर तीन अपत्य असल्याने ग्रामपंचायत अधिनियम१९५९ चे कलम १४ अन्वये विवाद अर्ज दाखल केला होता. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्व संबंधितांना नोटीस पाठवून अर्जदार व जाब देणारे यांचे जाबजबाब घेऊन त्यांनी दिलेल्या पुराव्याची कागदपत्रांची पडताळणी केली. त्यात तक्रारदार सुतार यांचा अर्ज ग्राह्य धरुन मान्य करण्यात येऊन सदस्य कोंढाळकर यांना ग्रामपंचायत सदस्यपदी राहण्यास अपात्र ठरवण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या ११ डिसेंबर २०२४ च्या निर्णयाचे पत्र तक्रारदार यांच्यासह तहसीलदार भोर, गटविकास अधिकारी भोर, मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद पुणे व ग्रामसेवक ग्रामपंचायत कांबरे खे.बा. यांना पाठवण्यात आले.

पुणे महापालिकेच्या नगरसचिवपदी योगिता भोसले यांची नियुक्ती

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेच्या नगरसचिवपदी राजशिष्टाचार अधिकारी योगिता भोसले यांची अखेर पदोन्नतीद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. एका बाजूला महापालिका अमृतमहोत्सव (७५ वर्षे) पूर्ण करत असतानाच पालिकेच्या इतिहासातील त्या पहिल्या महिला नगरसचिव बनल्या आहेत.

३१ ऑगस्ट २०२० रोजी सुनील पारखी सेवानिवृत्त झाल्यानंतर नगरसचिव पदाचा अतिरिक्त कारभार कामगार कल्याण अधिकारी शिवाजी दौंडकर यांच्याकडे सोपविण्यात आला होता. १ सप्टेंबर २०२० ते ३१ मे २०२३ पर्यंत शिवाजी दौंडकर सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कारभार होता. शिवाजी दौंडकर सेवानिवृत्त झाल्यानंतर १ जून २०२३ पासून राजशिष्टाचार अधिकारी योगिता भोसले यांच्याकडे नगरसचिव पदाचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर आता आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी नगरसचिव पदावर नियुक्ती केली आहे.

पुणे महापालिकेच्या नगरसचिव पदी योगिता

भोसले यांची झालेली निवड ही अतिशय योग्य असल्याचे सांगत माजी महापौर संघटनेने भोसले यांच्या निवडीचे स्वागत केले आहे. पहिल्या महिला नगरसचिव होण्याचा मान त्यांनी मिळवला आहे. नगरसचिव कार्यालयात गेली अनेक वर्ष त्या काम करीत आहे. कुठल्याही राजकारणाला बळी न पडता नियमाप्रमाणे काम करीत आहेत, हे आम्ही अनेक जणांनी पाहिले आहे. या पुढील काळात त्यांच्याकडून अशाच प्रकारच्या कामाची अपेक्षा आहे. संघटनेच्या अध्यक्षा राजलक्ष्मी भोसले, सचिव कमल व्यवहारे व निमंत्रक अंकुश काकडे यांनी एका पत्रकाद्वारे या निवडीचे स्वागत केले आहे.

संकष्टी चतुर्थीनिमित्त घेतले लाखो भाविकांनी 'श्री विघ्नहरा'चे दर्शन !

ओझर । प्रतिनिधी

अष्टविनायकांतील मुख्य स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर संकष्टी चतुर्थी निमित्त लाखो भाविकांनी विघ्नहराच्या दर्शनाचा लाभ घेतला. येथे पहाटे ५ वाजता श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळासाहेब कवडे, विश्वस्त संतोष कवडे, विनायक मांडे, शिल्पा जगदाळे यांच्या शुभहस्ते श्रींना महाअभिषेक पूजा करून दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

मंदिरामध्ये चतुर्थी निमित्त महाआरती करण्यात आली. महाआरतीचा मान गणेशभक्त, संतोष कवडे, विजय जगताप, गुलाब जाधव, सुमित चव्हाण, निखील प्रजापती यांना मिळाला. पहाटे पाच ते रात्री अकरापर्यंत रांगेत सुमारे पन्नास हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

तू अभ्यास करत नाही, माझी इज्जत घालवणार दिसतोय म्हणत बापानेच केला मुलाचा खून

बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील होळ येथील पियुष भंडलकर या नऊ वर्षीय बालकाचा त्याच्याच वडिलांनी मुलगा अभ्यास करत नाही म्हणून रागाच्या भरात भिंतीवर डोकं आपटून आणि गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

१४ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता राहत्या घरी ही घटना घडल्याची माहिती आहे. त्यानंतर हा सर्व प्रकार दडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वडगाव निंबाळकर पोलिसांनी या खुनाचं रहस्य उलघडवत वडील विजय भंडलकर, मयत पियुषची आजी शालन भंडलकर आणि संतोष भंडलकर या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. वडील विजय भंडलकर यांनी मुलगा पियुष याला तू अभ्यास करत नाही, सारखा बाहेर खेळत असतो, तू तुझ्या आईच्या वळणावर जावून माझी इज्जत घालवणारा दिसतोय, असे म्हणत त्याला हाताने मारहाण केली.

राग अनावर झाला आणि त्यात विजयने मुलाचा गळा दाबून त्याला भिंतीवर आपटले यात त्याचा मृत्य झाला. पियुष याची आजी हे सर्व पाहत होती पण तिने मुलगा विजयला अडवलं नाही. त्यानंतर विजय याच्या सांगण्याप्रमाणे पियुष हा चक्कर येवून पडला आहे, अशी खोटी माहितीही तिने दिली. संतोष भंडलकर याने डॉ. भट्टड यांच्या दवाखान्यात पियुषला नेल्यानंतर तेथे विजय याच्या सांगण्यावरून पियुष हा चक्कर येवून पडल्याची खोटी माहिती दिली. डॉक्टरांनी पियुष याला होळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घेवून जाण्याचा सल्ला दिला. मात्र तेथे न नेता आणि मयताबाबत गावातील पोलीस पाटील अथवा इतर कोणालाही काहीही न सांगत नातेवाईकांना बोलावून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचे शवविच्छेदन न करता थेट अत्यंविधीची तयारी केली. पोलिसांना खबऱ्याकडून ही माहिती समजताच पोलिसांनी अंत्यविधी थांबवत पियुष याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बारामतीला नेला आणि त्यानंतर तपासात बापानेच पियुषची हत्या केल्याचं समोर आलं आहे.

जप्त केलेल्या मालमत्तेचे सील तोडल्याने सरस्वती विद्यालयावर गुन्हा

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मालमत्ताकर न भरल्याने पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली येथील सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँण्ड कॉलेजची मालमत्ता सील करून जप्त करण्यात आली होती. ते सील तोडून आतमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी सुरेश विठ्ठल जाधव (रा. चिखली) यांच्यावर चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ताकर वसुलीसाठी विविध मोहीम राबवल्या जातात. मालमत्ताधारकांना कर भरण्याचे वारंवार आवाहन करण्यात येते. वेळप्रसंगी नोटीस देण्यात येते. मात्र, त्यानंतरही मालमत्ताकर न भरल्यास मालमत्ता जप्त करून ती सील करण्यात येते. जप्त केलेल्या मालमत्तेचे सील अनधिकृतपणे तोडून मालमत्तेत प्रवेश केल्याचा प्रकार चिखली येथे घडला आहे. पवारवस्ती, कुदळवाडी येथे सुरेश जाधव यांची सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँण्ड कॉलेज आहे. या मालमत्तेवर एकूण २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये तर, शास्तीकर ३० लाख ८९ हजार २२६ रुपये अशी एकूण ५५ लाख ४९ हजार ६४ रूपये थकबाकी आहे. त्यापैकी शास्ती कर वगळून २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये मालमत्ताकर भरल्यास शास्ती कर माफ होणार आहे. थकीत कर भरण्याबाबत वारंवार मालमत्ता धारकास वारंवार कळविण्यात आले. बिल भरण्यास टाळाटाळ केल्याने ३१ डिसेंबर २०२४ ला चिखली कर संकलन कार्यालयाने सदर मालमत्ता जप्त करून सील केली. सुरेश जाधव यांनी सील तोडून ४ जानेवारीला प्रवेश केला. तेथील तोडण्यात आलेले नळजोड अनधिकृतपणे सुरू केले. याप्रकरणी करसंकलन विभागाच्या चिखली विभागीय कार्यालयातील सहाय्यक मंडलाधिकारी बाळू लोंढे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२९ (३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.